

आलिया भट्ट सोशल मीडिया खाते डिलीट करू इच्छिते (पान ६ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



पाटील चालेल पण पटेल नको:राज ठाकरे (पान ८ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ | E-mail : divyawatanngp@gmail.com | रविवार दिनांक १ फेब्रुवारी २०२६ | अंक : १७७ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...

### जि.प. अधिकारी, कर्मचारी क्रीडा, सांस्कृतिक महोत्सवाला प्रारंभ



अमरावती- जिल्हा परिषदेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाला शनिवार, ३१ जानेवारीपासून सुरुवात झाली आहे. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रांगणात मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांच्या हस्ते कबड्डीच्या क्रीडांगणाचे पूजन करून महोत्सवाचा प्रारंभ करण्यात आला. हा महोत्सव आगामी २ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. यामध्ये १५ संघांमधील सुमारे तीन हजार अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत. यावेळी अतिरिक्त सीईओ श्रीराम कुळकर्णी, बीडीओ विनोद खेडकर, गुणवंत वरघट, प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल, नितिन उंडे यांच्यासह सर्व समित्यांचे प्रमुख उपस्थित होते. महोत्सवातील विजेत्या संघांना २ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता जिल्हा परिषद कन्या शाळा कॅम्प, अमरावती (गर्ल्स हायस्कूल) येथे बक्षीस वितरण केले जाईल. पुरुष क्रिकेट वगळता सर्व सांघिक स्पर्धांचे आयोजन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे करण्यात आले आहे. कबड्डीचे सर्व सामने पारंपरिक पद्धतीने मातीच्या मैदानावर खेळवले जात आहेत.सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन संगीतसूर्य केशवराव भोसले सभागृह येथे सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत होणार आहे. ही माहिती क्रीडा संयोजक डॉ. नितिन उंडे, प्रसिद्धी समितीचे प्रमुख विनोद गाडे, विनायक लकडे, राजेश सावरकर आणि पुनम उके यांनी दिली.

### जि.प.समोर वेतन 'स्लिप'साठी तीव्र आंदोलन

यवतमाळ - वेतन खात्यात जमा होत असूनही स्लिप न देणे, ऑनलाइन कामांसाठी मोबाईल डेटा न उपलब्ध करून देणे आणि विविध योजनांचा मोबदला थकवणे या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ आशा व गट प्रवर्तकांनी जिल्हा परिषदेसमोर आंदोलन छेडले. यवतमाळ जिल्ह्यातील आशा व गट प्रवर्तक कर्मचारी गेल्या काही वर्षांपासून विविध प्रशासकीय अडचणींना सामोरे जात आहेत. शासन निर्णयानुसार वेतन स्लिप देणे बंधनकारक असतानाही ती देण्यात येत नसल्याची तक्रार आहे. या संदर्भात जिल्हा आशा-गटप्रवर्तक कर्मचारी युनियनने वारंवार पाठपुरावा केला, मात्र प्रशासनाकडून दखल घेतली गेली नाही.

# जबाबदारी स्वीकारताना मन भरून येतंय..

## दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने पुढे चालत राहीन - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबई- महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी आपली पहिली अधिकृत प्रतिक्रिया दिली आहे. पती आणि राज्याचे लाडके नेते अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे ओढवलेल्या दुःखाच्या सावटाखाली असतानाच, त्यांनी "दादांच्या विचारांचा वारसा आणि महाराष्ट्राच्या विकासाचा ध्यास पुढे नेणार," असा दृढ निश्चय व्यक्त केला आहे. ही जबाबदारी स्वीकारताना त्यांचे मन भरून आले असून, त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानले आहेत.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताना मन अत्यंत भावुक झाले आहे. आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेताना 'शिव–शाहू–फुले–आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्यभावनेने ही जबाबदारी स्वीकारत आहे.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, दादांच्या अकाली जाण्याने वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. मात्र त्यांनी दिलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची प्रामाणिक बांधिलकी हाच माझा खरा आधार आहे.





त्यांच्या स्वप्नातील न्यायप्रिय, समताधिष्ठित आणि विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने आणि लोकाभिमुखतेने काम करत राहीन, हा विश्वास मी आज या निमित्ताने देते.

या कठीण काळात महाराष्ट्रातील जनतेने दिलेले प्रेम, विश्वास आणि पाठिंबा हेच माझे सर्वात मोठे बळ आहे. आपल्या विश्वासाच्या जोरावर, दादांच्या विचारांना उजाळा देत, नव्या आशेने आणि नव्या ऊर्जेने पुढे चालत राहीन. शेतकऱ्यांच्या हितासाठी, युवकांच्या संधींसाठी, महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या प्रत्येक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे हे माझे सर्वोच्च प्राधान्य असेल, असेही सुनेत्रा पवार म्हणाल्या.

देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी साहेबांच्या 'विकसित भारत 2047' या संकल्पनेला बळ देण्यासाठी तसेच देशाचे गृह व सहकारमंत्री आदरणीय अमित शाह साहेबांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यास राज्य शासन सदैव तत्पर राहील. तसेच, नव महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांचा वारसा समर्थपणे पुढे नेण्याची जबाबदारी आम्ही सर्वजण अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडू, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या.

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या साथीने महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी, सामाजिक समता, आर्थिक प्रगती आणि सर्वसमावेशक समृद्धी साधण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. जनतेच्या अपेक्षांना न्याय देणे, शासन-प्रशासन अधिक संवेदनशील व लोकाभिमुख बनवणे आणि राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेणे, हाच माझा संकल्प आहे.पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जनतेचे, सहकाऱ्यांचे मनापासून आभार मानते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील सहकाऱ्यांनी माझ्यावर ठेवलेल्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करीन, हा शब्द देते, असेही सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे.

अजित पवारांच्या निधनाच्या चौथ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची आज शपथ घेतली. आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

## पार्थ-शरद पवार यांच्या भेटीनंतर चित्र बदलले? पवार कुटुंब एकत्र येण्याचा निर्णय; गोविंदबागेतील बैठकीनंतर मोठा दावा, गैरसमज दूर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबईत सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीची तयारी सुरू असताना सकाळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी या शपथविधीबाबत मला माहिती नव्हती, विश्वासात घेतले गेले नाही, असे स्पष्ट केल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात अनेक तर्क-वितर्क सुरू झाले. शपथविधीच्या पार्श्वभूमीवर पवार कुटुंबात दुरावा निर्माण



झाल्याची चर्चा रंगू लागली. याच दरम्यान पार्थ पवार अचानक शरद पवारांच्या भेटीसाठी गेले. या भेटीतील चर्चा काय झाली, याची सुरुवातीला कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नाही. पार्थ पवार बैठक संपल्यानंतर माध्यमांशी एक शब्दही न बोलता निघून गेले.काही वेळानंतर आमदार रोहित पवार आणि युगेंद्र पवार हे दोघे एकाच गाडीतून त्या ठिकाणी पोहोचले. त्यांनीही कोणतीही प्रतिक्रिया न देता बैठकस्थळ सोडले. त्यामुळे राजकीय चर्चांना आणखी उधाण आले. पवार कुटुंबात नेमकं काय घडत आहे, याबाबत उत्सुकता वाढली. मात्र या सर्व घडामोडींनंतर सुमारे तासाभराने महत्त्वाची माहिती समोर आली आणि या संपूर्ण चित्राला नवं वळण मिळालं.

विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि दिवंगत अजित पवार यांचे अत्यंत विश्वासू म्हणून ओळख असलेल्या किरण गुजर यांनी या बैठकीबाबत मोठा दावा केला. गुजर यांच्या माहितीनुसार, पार्थ पवार यांनी शरद पवार यांची भेट घेऊन सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीचे निमंत्रण दिले. शपथविधीच्या संदर्भात जे समज-गैरसमज निर्माण झाले होते, ते या बैठकीत दूर करण्यात आले

## सख्ख्या भावांचा कालव्यात बुडून मृत्यू

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

भंडारा- जिल्ह्यातून एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी आणि ऐतिहासिक वारसा अनुभवण्यासाठी गेलेल्या दोन तरुण भावांवर काळाने घाला घातला आहे. तुमसर तालुक्यातील प्रसिद्ध अंबागड किल्ला पाहिल्यानंतर, जवळच असलेल्या बावनथडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यात आंघोळीसाठी उतरले असता, पाण्याचा अंदाज न आल्याने दोन सख्ख्या भावांचा बुडून मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना शनिवारी दुपारी घडली.मिळालेल्या माहितीनुसार, जागेश्वर वाढीवे (वय २९) आणि दीपक वाढीवे (वय २६) अशी मृत भावांची नावे आहेत. हे दोघेही लाखनी तालुक्यातील रामपुरी येथील रहिवासी होते. वाढीवे बंधू आपल्या मित्रांसह गोंड राजांच्या काळातील ऐतिहासिक अंबागड किल्ला पाहण्यासाठी तुमसर तालुक्यात आले होते.

# इराणमधील ७ शहरांमध्ये स्फोट, ५ लोकांचा मृत्यू:१४ जखमी

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

इराणमधील किमान 7 शहरांमध्ये स्फोटांची बातमी आहे. विविध मीडिया रिपोर्ट्सनुसार, शनिवारी राजधानी तेहरान, परंद, तबरीज, कोम, अहवाज, नंताज आणि बंदर अब्बास येथे स्फोट झाल्याचे दावे करण्यात आले आहेत.

तुर्कस्तानच्या अनादोलु वृत्तसंस्थेनुसार, किमान 5 लोकांचा मृत्यू झाला आहे आणि 14 जण जखमी झाले आहेत. इराण सरकारने याची पुष्टी केलेली नाही. मात्र, इस्रायलच्या दोन अधिकाऱ्यांनी माध्यमांना सांगितले आहे की, या स्फोटांमध्ये इस्रायलचा सहभाग नाही.

दरम्यान, तसनीम वृत्तसंस्थेने सोशल मीडियावर सुरू असलेल्या त्या बातम्यांना चुकीचे ठरवले आहे, ज्यात रिव्होल्यूशनरी गार्डच्या नौदल कमांडरला लक्ष्य करण्यात आल्याचे म्हटले जात होते.

सरकारी वृत्तपत्र तेहरान टाइम्सनुसार, अहवाजमध्ये एका निवासी इमारतीत गॅस स्फोट झाला होता, ज्यात चार लोकांचा मृत्यू झाला. तर बंदर अब्बासमध्ये एका इमारतीत स्फोट झाला, ज्यामुळे तिच्या दोन मजली कोसळल्या आणि अनेक दुकानेही उद्ध्वस्त झाली. या स्फोटात एकूण 14 लोक जखमी झाले.

सरकारी टीव्हीवर दाखवलेल्या छायाचित्रांमध्ये दिसले की, इमारतीचा समोरील भाग पूर्णपणे उडून गेला आहे, आतील भाग स्पष्ट दिसत आहे आणि आजूबाजूला ढिगारा पसरलेला आहे.


बंदर अब्बासच्या बचाव विभागाच्या अधिकाऱ्याने इराणी वृत्तसंस्था IRNA ला सांगितले की, या घटनेत जखमी झालेल्या लोकांना आपत्कालीन सेवांच्या मदतीने रुग्णालयात पोहोचवले जात



आहे.

इराणमध्ये 35 दिवसांपासून सरकारच्या विरोधात निदर्शने सुरू

हा स्फोट अशा वेळी झाला आहे जेव्हा इराणमधील परिस्थिती तणावपूर्ण आहे. 28 डिसेंबर रोजी सरकारविरोधी



देशव्यापी निदर्शने सुरू झाली होती, जी अजूनही सुरू आहेत.

एका इराणी अधिकाऱ्याने रॉयटर्सला सांगितले की, या निदर्शनांमध्ये किमान ५,००० लोक मारले गेले, ज्यामध्ये ५०० सुरक्षा दलाचे



सदस्य देखील समाविष्ट होते. दुसरीकडे, अलीकडेच अमेरिकेने वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर या प्रदेशात एक विमानवाहू नौका तैनात केली आहे.

# रोहित पवारांकडून विदीप जाधवांच्या कुटुंबियांचे सांत्वन

## दोन्ही मुलांशी संवाद साधत दिला आधार, दोघांच्या शिक्षणाची घेतली जबाबदारी



**दिव्य वतन /वृत्तसेवा**

सातारा-बारामतीतील विमान अपघातात अजित पवार यांच्या सोबत त्यांचे वैयक्तिक सुरक्षा रक्षक (पीएसओ) आणि फलटण तालुक्यातील तरडगावचे सुपुत्र विदीप जाधव यांचाही मृत्यू झाला होता. आमदार रोहित पवार यांनी शनिवारी विदीप जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच त्यांची मुलगी नेत्रा आणि मुलगा आद्विक यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेतली.

राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांना सावलीसारखी साथ देणारे त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव यांचाही विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कारही झाले. परंतु, फलटणच्या नेतेमंडळीना जे जमले नाही, ते आमदार रोहित पवार यांनी करून दाखविले. दिवंगत विदीप जाधव यांची मुले नेत्रा आणि अद्विक यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी उचलून कुटुंबियांना आधार दिला.

यासंदर्भात आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटलंय की, विदीप जाधव यांनी अजितदादांचे अंगरक्षक म्हणून अनेक वर्षे काम केले होते. दुर्दैवाने दोघांचाही विमान अपघातात मृत्यू झाला. अजितदादांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र जसा दुःखात आहे तसेच विदीप जाधव यांच्या कुटुंबावरही



दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दुःख शेअर केल्याने कमी होतं, म्हणून आज फलटण (तरडगाव) इथं जाधव कुटुंबियांची भेट घेऊन विचारपूस केली आणि या कठीण प्रसंगी आम्ही सर्वजण त्यांच्या कुटुंबासोबत असल्याचा विश्वास त्यांना दिला.खरं तर आमदार रोहित पवार केवळ सांत्वन करून थांबले नाहीत, तर त्यांनी विदीप जाधव यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. या घटनेतून त्यांच्यातील संवेदनशील माणुसकीचे दर्शन घडले. पवार कुटुंबीयांना पुरोगामी आणि सामाजिक कार्याचा मोठा वारसा आहे. तेच संस्कार आमदार रोहित पवार यांच्या कृतीतून दिसले.


१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...



### पेट्रोलपंप चालकाच्या बंगल्यातील चोरी प्रकरणी दोन आरोपी अटक

नागपूर-सदर परिसरात पेट्रोलपंप चालकाच्या बंगल्यात झालेल्या चोरीप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. या घटनेनंतर तेरा दिवसांनी गुन्हे शाखेने ही कारवाई केली असून, आरोपींकडून 3 कोटी 33 लाख 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक केलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीने चोरी केलेले पैसे आपल्या प्रेयसीवर खर्च करण्याची योजना आखली होती, अशी माहिती समोर आली आहे. त्याची प्रेयसी हैदराबाद येथे एमबीबीएसचे शिक्षण घेत असून, आरोपीला तिला भारतातील विविध पर्यटनस्थळी फिरवण्यासाठी आणि महागड्या भेटवस्तू देण्यासाठी पैशांची गरज होती.शिर्के लेआउट येथील रहिवासी बलजिंदर सिंग इंद्रजित सिंग नय्यर (56) आणि त्यांचे बंधू शहरात पेट्रोल पंप व इतर व्यवसाय चालवतात. 19 जानेवारी रोजी सायंकाळी बलजिंदर सिंग यांच्या धाकट्या मुलाचा कळमेश्वर येथील फार्महाऊसवर साखरपुडा होता. त्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्य फार्महाऊसवर गेले होते आणि घरात कोणीही नव्हते. मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्याने घराच्या मागील बाजूस असलेल्या स्वयंपाकघरातील खिडकीचे ग्रील तोडून घरात प्रवेश केला.चोरट्याने बलजिंदर यांच्या आईच्या खोलीतील कपाटाचे कुलूप तोडून 247 सोन्याचे दागिने, 1 कोटी रुपये किमतीचे हिऱ्यांचे दागिने आणि त्यांच्या भावाच्या खोलीतून 65 लाख रुपये रोख रक्कम लंपास केली. एकूण 3 कोटी 91 लाख 50 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता.

### स्वरमेघ आर्ट फाउंडेशन तर्फे "मानपत्र" प्रदान व "स्वरचैतन्य" पुरस्कार प्रदान सोहळा

नागपूर : स्वरमेघ आर्ट फाउंडेशन च्यावतीने एम के एच संचेती पब्लिक स्कूल, नारायणी हॉल, हिंदुस्तान कॉलनी, साई मंदिर समोर, वर्धा रोड, नागपूर येथे रविवारी १ फेब्रुवारी रोजी सकाळी 8.30 ते 10.30 या वेळेत, आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष मनीष उपाध्ये यांनी केले असून सर्व पदाधिकारी यात सहभागी राहतील. तसेच विदर्भ स्तरीय "सप्तसूर" ही गायन स्पर्धा घेण्यात येत आहे. याचे मुख्य विशाखा पाध्ये, शर्वरी पुराणिक या आहेत. असे संस्थेचे कोषाध्यक्ष दिनेश टेकाडे आणि सचिव प्रबोध देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# नीता ठाकरे महापौर, संजय बालपांडे उपमहापौर तर शिवानी दाणी स्थायी समिती सभापती?

## बाल्या बोरकर झाले सत्तापक्ष नेता

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : नागपूर महानगरपालिकेतील सत्तास्थापनेबाबत राजकीय हालचालींना वेग आला असून, महत्त्वाच्या पदांवरील नावांबाबत विविध शक्यता वर्तविल्या जात आहेत. दरम्यान, नागपूर महानगरपालिकेच्या सत्तापक्ष नेतेपदी ज्येष्ठ नगरसेवक बाल्या (नरेंद्र) बोरकर यांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. महापौरपदासाठी नीता ठाकरे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा असून, उपमहापौरपदी संजय बालपांडे यांना संधी मिळणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. स्थायी समिती सभापतीपदासाठी शिवानी दाणी यांच्या नावाची जोरदार चर्चा असून, त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सत्तावाटप करताना पक्षाकडून अनुभव, संघटनात्मक निष्ठा आणि प्रादेशिक समतोल यांचा विचार केला जात आहे. महापालिकेतील विविध प्रभागांतील प्रतिनिधित्व आणि उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम नागपूरचा समतोल साधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे समजते.







सत्तापक्ष नेतेपदी बाल्या बोरकर यांच्या नियुक्तीमुळे अनुभवी आणि प्रशासनाची सखोल जाण असलेला नेता सभागृहात सत्तापक्षाची धुरा सांभाळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती सभापतीपदाबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. या पार्श्वभूमीवर, नीता ठाकरे महापौर होतील का? संजय बालपांडे उपमहापौरपद मिळवतील का? शिवानी दाणी स्थायी समिती सभापती बनतील का? या प्रश्नांची उत्तरे लवकरच समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे

## आंभोरा देवस्थान परिसर अतिक्रमणमुक्त; भाविकांसाठी स्वच्छ व सुरक्षित वातावरण

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी





आंभोरा - कुही नागपूर जिल्ह्यातील प्रसिद्ध व भव्य आंभोरा देवस्थानाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मंदिर परिसरातील बेकायदेशीर व अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत. या कारवाईमुळे मंदिर परिसर अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित झाला आहे. आंभोरा देवस्थानात दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र परिसरात असलेल्या काही अनधिकृत दुकानांमुळे अस्वच्छता निर्माण होत होती तसेच भाविकांच्या वर्दळीत अडथळे येत होते. या सर्व बाबी लक्षात घेऊन मंदिर परिसर स्वच्छ व मोकळा ठेवण्याच्या उद्देशाने ही अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. ही मोहीम वेलतूर पोलीस प्रशासन, आंभोरा देवस्थान समिती तसेच संबंधित प्रशासकीय यंत्रणांच्या संयुक्त सहकार्याने शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याची विशेष दक्षता घेण्यात आली. या निर्णयाचे भाविकांनी स्वागत केले असून, यामुळे मंदिर परिसर अधिक सुंदर होईल व भक्तिमय वातावरणाच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. भविष्यात देवस्थानाच्या सर्वांगीण विकासासाठी आणखी सुविधा उपलब्ध करून देण्याचा संकल्प देवस्थान समितीने व्यक्त केला आहे.

## नागपूर महानगरपालिकेच्या सत्तापक्ष नेतेपदी बाल्या (नरेंद्र) बोरकर

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



नागपूर :नागपूर महानगरपालिकेतील सत्तापक्ष नेता म्हणून ज्येष्ठ नगरसेवक बाल्या (नरेंद्र) बोरकर यांच्या नावाची अधिकृत घोषणा भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी केली.

महापालिकेच्या कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आणि संघटनात्मक कौशल्य लक्षात घेऊन पक्षाने ही महत्त्वाची जबाबदारी बोरकर यांच्याकडे सोपवली आहे. बाल्या बोरकर हे गेल्या अनेक दशकांपासून नागपूरच्या राजकारणात सक्रिय असून, त्यांनी नगरसेवक म्हणून विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या आहेत. महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजाची सखोल जाण, धोरणात्मक निर्णयक्षमता आणि सर्वसामान्य नागरिकांशी असलेला घनिष्ठ संपर्क ही त्यांची प्रमुख बलस्थाने मानली जातात. त्यांच्या निवडीमुळे पक्षाने एका निष्ठावान, अनुभवी आणि तळागाळाशी जोडलेल्या नेत्याच्या खांद्यावर सभागृहाचे नेतृत्व सोपवले असल्याचे स्पष्ट होते. आगामी काळात नागपूर महानगरपालिकेच्या विकासात्मक कामकाजाला गती मिळेल, तसेच सत्तापक्षाची भूमिका अधिक प्रभावीपणे मांडली जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. बाल्या बोरकर यांच्या निवडीचे भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समर्थकांकडून स्वागत होत असून, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## आय. आय. एम. नागपूरच्या पुढाकारातून होणार महाराष्ट्रातील गावांचा कायापालट
## टाटा मोटर्स फाउंडेशन व राज्य सरकारसोबत 'IVDP २.०' अंतर्गत महत्त्वपूर्ण करार

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



नागपूर -महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाला नवी दिशा देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण उपक्रमाला आज भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर येथून सुरुवात करण्यात आली. आय. आय. एम. नागपूर, टाटा मोटर्स फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त सहकार्याने इंटिग्रेटेड व्हिलेज डेव्हलपमेंट प्रोग्राम – IVDP 2.0 राबवण्यात येणार आहे.

या उपक्रमाअंतर्गत राज्यातील गावांचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या संदर्भातील सामंजस्य करारावर आय. आय. एम. नागपूरचे संचालक डॉ. भिमराया मेत्री आणि टाटा मोटर्स फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद कुलकर्णी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या प्रसंगी मुख्यमंत्री कार्यालयाच्या वतीने प्रिया खान, आय. आय. एम. नागपूरचे प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस असलेले माजी आयएएस अधिकारी प्रो. अनूप कुमार, आय. आय. एम. चे मुख्य कार्यक्रयरी अधिकारी कर्नल मकरंद अलूर आणि प्रा. नीलकंठ ढोणे हे उपस्थित होते. या उपक्रमात टाटा मोटर्स फाउंडेशन आर्थिक सहकार्य करणार असून, राज्य सरकार प्रशासकीय पाठबळ देणार आहे. भारतीय प्रबंध संस्थान नागपूर या प्रकल्पासाठी 'नॉलेज पार्टनर' म्हणून काम करणार आहे. तसेच राज्याची प्रशिक्षण संस्था 'यशदा' यांच्या सहकार्याने क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून, सरकारी योजना थेट गरजूंपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात येणार आहे. या वेळी बोलताना डॉ. भिमराया मेत्री, "नागपूरच्या प्रबंध संस्थानचे ज्ञान केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित राहू नये, ही आमची भूमिका आहे.

या उपक्रमातून आम्ही थेट शेतकरी आणि ग्रामीण कुटुंबांपर्यंत पोहोचत आहोत. आधुनिक व्यवस्थापनाच्या माध्यमातून शिक्षण, शेती आणि उपजीविकेला नवी दिशा देण्याचा आमचा प्रयत्न आहे." विनोद कुलकर्णी यांनी सांगितले की, आय. आय. एम. नागपूर ग्रामपंचायत विकास आराखडा अधिक सक्षम व परिणामकारक बनवण्यासाठी मार्गदर्शन करणार आहे. "आराखड्यांची पडताळणी, अंमलबजावणी आणि तीन वर्षांनंतर प्रभाव मूल्यांकन करण्यातही संस्थेचा मोलाचा वाटा असेल," असेही ते म्हणाले. प्रा. नूप कुमार यांनी सांगितले की, या उपक्रमाचा उद्देश गावांना आत्मनिर्भर बनवण्याचा आहे. "महाराष्ट्रातून सुरू होणारा हा मॉडेल प्रकल्प भविष्यात देशातील इतर राज्यांसाठीही आदर्श ठरेल," असे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रतिनिधी प्रिया खान यांनी राज्य सरकारची कटिबद्धता व्यक्त करत सांगितले की, हा उपक्रम राज्याच्या विकास योजनांना अधिक पारदर्शक, परिणामकारक आणि लोकाभिमुख बनवेल.

## श्री उमियाशंकर नारायणजी हायस्कूलमध्ये गणतंत्र दिवस संपन्न



दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर, :श्री उमियाशंकर नारायणजी हायस्कूलमध्ये ७७वा गणतंत्र दिवस हर्षोल्लासात संपन्न झाला.अध्यक्ष माननीय नरेंद्रभाई झा , मुख्य अतिथि अधिवक्ता शैलेशभाई द्विवेदी यांनी ध्वजारोहण करून कार्यक्रमाची की सुरुवात केली. विद्यार्थ्यांनी परेड तसेच रंगाबेरंगी कार्यक्रम प्रस्तुत केले.कार्यक्रमा अंतर्गत 10वी आणि 12वीच्या प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले .कार्यक्रमात खेताभाई पटेल, चंद्रेशभाई बदानी, रचितभाई ठाकर, राजेशभाई ठाकर, पीयूषभाई ठाकर, गुजराती मंडळाचे पदाधिकारी, मुख्याध्यापिका संतोषी गुप्ता, पर्यवेक्षक अमृतलाल खेतानी , शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# जनसेवेसाठी व्यस्त असताना येणारे मृत्यू जीवनकार्याला अजरामर देणारे असतात- कुमार विश्वास

## वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, जिल्हाधिकारी डॉ विपीन इटनकर यांची प्रमुख उपस्थिती, स्व अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून रामटेक महोत्सवाला प्रारंभ

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी






नागपूर, :- प्रभू श्रीराम यांनी प्रतिज्ञा घेवून तपश्चर्या केलेली ही भूमी आहे. या भूमीतून आपण ज्यांनी जनसेवेसाठी आयुष्यभर तपश्चर्या केली, अहोरात्र आयुष्य वेचले अशा स्व अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या जीवनकार्याचे स्मरण करू या शब्दात कुमार विश्वास यांनी रामकथा सुरू करण्यापूर्वी आपल्या भावना व्यक्त केल्या. स्व अजित पवार यांना सर्व मान्यवर व श्रोत्यांनी श्रद्धांजली अर्पण करून कुमार विश्वास, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, नगर अध्यक्ष बिकेंद्र महाजन व मान्यवरांचा हस्ते दीपप्रज्वलन करून रामकथेस प्रारंभ करण्यात आला.

'जन्म माणसाला मोठे करत नाही परंतु तुम्ही जाताना काय निर्माण करून जाता त्याने माणूस मोठा होतो. स्व अजित दादा यांच्या आठवणींचा ठेवा प्रत्येकाजवळ आहे. आजही आपण त्यांच्या दुःखात आहोत.

जीवनाच्या क्रमाला यात खंड जरी पडत असला तरी काळाला थांबता येत नाही. जनसेवेसाठी कामात व्यस्त असताना येणारे मृत्यू त्यांच्या जीवनकार्याला अमर करतात' असे सांगून कुमार विश्वास यांनी आपली त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. माजी राष्ट्रपती ए पी जे अब्दुल कलाम हे विद्यार्थ्यांशी संवाद साधता साधता समाधिस्त झाले. असे मृत्यू मृत्यू नसतात तर यात खऱ्या अर्थाने मोक्ष असतो. असेच व्यक्ती मोठे असतात हे सांगून त्यांनी स्व अजित पवार यांच्या कार्यपद्धतीची प्रशंसा केली. इथे रामाची पाऊले उमटली. इथे सीतामाईने स्नान केले. या भूमीतून रामकथेच्या माध्यमातून त्यांना वंदन करण्याची संधी मिळाली याचे मनस्वी समाधान असून इथे तीन दिवस हा संवाद साधू अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. रामटेक येथील नेहरू मैदानावर आयोजित कार्यक्रमाला मोठ्या संख्येने श्रोत्यांची उपस्थिती होती. रामटेकच्या सांस्कृतिक वैभवाला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी हा महोत्सव आयोजित केला जातो. महोत्सवात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन महोत्सवादरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यात कबड्डी, कुस्ती, बॅडमिंटन, मॅरेथॉन स्केटिंग, क्रिकेट हॉलीबॉल स्केटिंग त्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

दिग्गज गायकांची पर्वणी तीन दिवसीय महोत्सवात दिग्गज गायकांची पर्वणी अनुभवायला मिळणार आहे. उद्या दि. १ फेब्रुवारी रोजी सोनू निगम यांची लाईव्ह इन कन्सर्ट असणार आहे. तर २ फेब्रुवारी रोजी समारोपीय कार्यक्रमात सुदेश भोसले आणि साधना सरगम यांची लाईव्ह इन कन्सर्ट असणार आहे.

## महत्त्वाचे...

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उद्घोष प्रजासत्ताकदिनी झालाच पाहिजे

अकोला - मंत्री गिरीश महाराज यांनी नाशिकमधील प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख न केल्याचे पडसाद उमटणे सुरुच असून, आता भीमशक्ती सामाजिक संघटना व अशोक प्रतिष्ठानने आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रजासत्ताकदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उद्घोष झालाच पाहिजे, अशी मागणी प्रतिष्ठानने केली असून महाजन यांनी माफी न मागितल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असाही इशारा देण्यात आला आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांतर्फे मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले. नाशिकमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शासकीय कार्यक्रमात मंत्री गिरीश महाजन यांच्या भाषणामुळे मोठा वाद निर्माण झाला. या कार्यक्रमात भाषण करताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेतल्याने उपस्थितांमध्ये असंतोष निर्माण झाला. विशेष म्हणजे, कार्यक्रमस्थळी उपस्थित असलेल्या एका महिला वन अधिकाऱ्याने थेट जाहीरपणे आक्षेप घेत संविधान निर्मात्यांचे नाव कसे विसरलात? असा सवाल केल्याने वातावरण काही काळ तणावपूर्ण बनले होते. दरम्यान प्रजासत्ताक दिनाच्या शासकीय कार्यक्रमात संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा जाणीवपूर्वक उल्लेख टाळण्यात आल्याचा आरोप करीत भीमशक्ती सामाजिक संघटना, अकोला व अशोक प्रतिष्ठानतर्फे निषेध नोंदवण्यात आला.

### कलांचे सादरीकरण, स्पर्धेतील गुणवंतविद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार



अकोट - तालुक्यातील रुईखेड येथे श्री बागाजी विद्यालय, श्रीराम कनिष्ठ महाविद्यालय व श्रीराम इंग्लिश स्कूलच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी संस्था सचिव माजी प्राचार्य संजय मानकर होते. उद्घाटक उद्यानपंडित पुरस्कार प्राप्त प्रभाकरराव मानकर होते. कार्यक्रमाला माजी जि.प सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मानकर, रुईखेड जि. प. केंद्र प्रमुख देवेंद्र केदार, मुख्याध्यापक मंगेश दसोडे, सेवानिवृत्त कर्मचारी श्रीकृष्ण घाणे, जेष्ठ पत्रकार रामभाऊ मेटकर, संस्था संचालक संगीता बाराहाते, छाया मानकर व विद्यालयाचे मुख्याध्यापक निनाद मानकर उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यालयातील माजी विद्यार्थी आशिष बोपुलकार याची सीआयएसएफमधे निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार घेण्यात आला. सूत्रसंचालन विशाल मांडवे यांनी तर प्रास्ताविक संतोष काळे यांनी केले. आभार प्रा. राहुल खंडारे यांनी मानले. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर नृत्य सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेत विविध झालेल्या खेळांचे,स्पर्धेचे विजेते झालेल्या विद्यार्थ्यांचे बक्षिश वितरणाचा कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक निनाद मानकर, अनिता भराटे, किरण मानकर, वनिता सरोदे, संतोष काळे, विशाल मांडवे, मंजूषा साठे, अनिल ओखारे, प्रा. रूपेश गायगोले, प्रा. राहुल खंडारे आदींनी परिश्रम घेतले.

# नागपुरात ओयो हॉटेलमधील तरुणीच्या हत्येप्रकरणी आरोपीला अटक
## सौरभ जामगडे तेलंगणा एक्सप्रेसमधून भोपाळमध्ये पोलिसांच्या ताब्यात

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी



नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर-नागपूर महामार्गावरील फेटरी गावातील ओयो हॉटेलमध्ये 22 जानेवारी रोजी एका तरुणीची चाकूने वार करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात फरार असलेला आरोपी सौरभ जामगडे याला पोलिसांनी भोपाळ येथे तेलंगणा एक्सप्रेसमधून अटक केली आहे. रुचिता राजेश भांगे (वय 21, रा. बोरगाव, नागपूर) असे मृत तरुणीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हॉटेलमध्ये रुचिता आणि आरोपी सौरभ जामगडे यांच्यात वाद झाला. या वादातून सौरभने रुचिताच्या गळ्यावर चाकूने वार केले. गंभीर जखमी झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. खुनानंतर आरोपीने हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारून घटनास्थळावरून पळ काढला होता.

या घटनेनंतर कळमेश्वर पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी चार पथके तयार केली होती. आरोपी सतत पोलिसांना हुलकावणी देत होता. घटनेच्या दिवशी तो पुण्याकडे गेल्याची माहिती मिळाल्याने पथके पुणे व पिंपरी चिंचवड येथे रवाना करण्यात आली होती. त्यानंतर 29 जानेवारी रोजी तो मोदा तालुक्यातील महालगाव येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिस महालगावकडे जात असतानाच, आरोपी नागपूरहून दिल्लीकडे जाणाऱ्या तेलंगणा एक्सप्रेसने निघाल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ भोपाळ रेल्वे पोलिसांशी संपर्क साधून मदत मागितली. अखेर, भोपाळ येथे तेलंगणा एक्सप्रेसमध्ये सौरभ जामगडे याला ताब्यात घेण्यात आले. त्याला नागपूरला आणून कळमेश्वर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. कळमेश्वर पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला ४ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी (PCR) सुनावली आहे.

# जनजागृती उपक्रम हाती घेऊनही अपघातांच्या संख्येत वाढ:शून्य अपघात धोरण असूनही 8 वर्षांत एसटीचे अडीच हजार प्राणांतिक अपघात

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : "प्रवाशांच्या सेवेसाठी' आणि "एसटीचा प्रवास सुरक्षित प्रवास' असे ब्रीदवाक्य असतानाही एसटी बस अपघाताची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे एसटी प्रवासाच्या सुरक्षित प्रवासावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अपघात होऊ नये यासाठी एसटी महामंडळाकडून चालकांची आरोग्य तपासणी करणे, अपघातांबाबत जनजागृती करणे इत्यादी उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. मात्र असे



असूनही अलीकडे एसटीच्या अपघातांची संख्या वाढत आहे. राज्यात गेल्या काही वर्षांपासून एसटी आणि बसच्या अपघातामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

२०१८-१९ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एस. टी. चे २,२६८ प्राणांतिक तर १०,१६० गंभीर अपघात झाले. यात प्रवासी २४८, रा. प. कर्मचारी ६५, पादचारी ५९०, इतर १,८४० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

२०१८-१९ मध्ये प्राणांतिक, गंभीर, किरकोळ अपघात मिळून ३३१०, २०१९-२० मध्ये ३३३७, २०२०-२१ मध्ये १४४५, २०२१-२२ मध्ये १२८१ अपघात झाले.

एक्स्पर्ट व्ह्यू - प्रयत्न तोकडे पडतात

शून्य टक्के अपघात हे धोरण असले तरी अपघात होऊ नये यासाठीचे प्रयत्न तोकडे पडतात. किमान १५ वर्षे जुया व खराब गाड्या, तांत्रिक बिघाड, चालकांचे प्रशिक्षण नियमित न होणे व खराब रस्ते आदी कारणांमुळे अलीकडे एसटी बसचे अपघात वाढलेले आहे. महामंडळात सर्वसामान्यांची म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लालपरी या नव्या गाड्यांची संख्या वाढवायला हवी. चालकाला वेळोवेळी प्रशिक्षित करावे लागेल. नादुरूस्त गाड्या रस्त्यावर धावत आहे.

# महात्मा गांधी शहीद दिनानिमित्त सूतकताई यज्ञ...

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अकोला- महात्मा गांधी शहीद दिनी गांधी- जवाहर बागेत सूतकताई यज्ञ- व्यसनमुक्ती संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात तसेच राष्ट्राच्या नैतिक जडणघडणीत महात्मा गांधींचे योगदान दीपस्तंभाप्रमाणे उजळून निघाले. सत्य, अहिंसा आणि सर्वोदय विचारांची अखंड ज्योत आजही समाजाला दिशा देत आहे. हा विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी "एक कदम गांधी के साथ' या उपक्रमाद्वारे ज्या ज्या ठिकाणी गांधीजींचा संचार झाला त्या ठिकाणांना भेटी देत संपर्क संवाद साधण्याचा संकल्प सर्वोदयी कार्यकर्त्यांनी आजच्या सूत कताई यज्ञप्रसंगी केला.

अध्यक्षस्थानी सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड होते. ज्येष्ठ सर्वोदयी महादेवराव भुईभार, विजय कौसल, डॉ. शि. ना. ठाकूर, कामगार नेते प्रदीप वखारिया, प्रा. विवेक हिवरे, ह. मो. खटोड, माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर उपस्थित होते.

# डीएससी अटकल्याने प्रधानमंत्री आवास योजनेचे हप्ते ठप्प
### कुहीतील शेकडो लाभार्थ्यांचे घरे अर्धवट; प्रशासनाविरोधात तीव्र संताप


दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

कुही : पंचायत समिती कुही अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मधील लाभार्थ्यांचे हप्ते गेल्या अनेक दिवसांपासून रखडल्याने तालुक्यात तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सहाय्यक लेखा अधिकारी यांचे डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (DSC) पोर्टलवरून डी-ॲक्टिव्हेट करण्याची प्रक्रिया प्रलंबित राहिल्याने हा गंभीर तांत्रिक अडथळा निर्माण झाला असून त्याचा थेट फटका शेकडो गरजू लाभार्थ्यांना बसत आहे. हप्ते न मिळाल्यामुळे तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांची घरे अर्धवट अवस्थेत आहेत.

बांधकामासाठी घेतलेले कर्ज, मजुरीचे पैसे आणि साहित्य खर्च यामुळे लाभार्थ्यांवर आर्थिक संकट ओढवले असून संतप्त नागरिक आता थेट प्रशासनाविरोधात रोष व्यक्त करू लागले आहेत. नेमके प्रकरण काय? मिळालेल्या माहितीनुसार, कुही पंचायत समितीतील सहाय्यक लेखा अधिकारी यांचे DSC तांत्रिक व प्रशासकीय कारणास्तव पोर्टलवरून हटवणे आवश्यक आहे. जोपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत नवीन नोंदणी तसेच लाभार्थ्यांचे हप्ते वितरित करणे अशक्य आहे. या संदर्भात पंचायत समिती कुही यांनी दिनांक 27 डिसेंबर 2025 रोजी संबंधित प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला होता.

मात्र, तब्बल एक महिना उलटूनही जिल्हा व विभागीय स्तरावरून ही कारवाई अद्याप पूर्ण झालेली नाही. विशेष म्हणजे, पंचायत समिती कुही कडून वारंवार वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करूनही या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र समोर येत आहे. एकीकडे केंद्र सरकारची महत्वाकांक्षी योजना गरिबांना हक्काचे घर देण्याचे उद्दिष्ट ठेवते, तर दुसरीकडे प्रशासनाच्या संथ आणि उदासीन कारभारामुळे ही योजना कुही तालुक्यात कागदावरच अडकून पडल्याचे चित्र आहे. तात्काळ DSC संबंधी प्रक्रिया पूर्ण करून रखडलेले हप्ते वितरित न केल्यास लाभार्थ्यांचा रोष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# संगीता ठलाल यांच्या "रानभाज्यांच्या जगात" संशोधन ग्रंथास प्रभूरत्नाई पुरस्कार जाहीर





दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

कुरखेडा : - मूळ गाव देऊळगाव येतील व सध्या कुरखेडा येथे वास्तव्यास असणाऱ्या शेतकरी व गृहिणी साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल यांनी चवथ्या वर्गात असताना पासून लिखाणाला सुरूवात केली तसेच लिखाणा सोबतच त्यांनी आजपर्यंत बरेच सामाजिक उपक्रम सुध्दा राबवले आहेत.त्यांनी विविध विषयांवर ज्वलंत व परखडपणे लिखाण केले आहेत. मानवी जीवनाला तसेच मुक्या प्राण्यांच्या आरोग्यासाठी लाभदायक असणाऱ्या रानभाज्या, रानफळं, कंदमुळं,वनस्पती तसेच निसर्गाच्या सान्निध्यात राहून वाढणाऱ्या वनस्पतींचे त्यांनी संशोधन करून या प्रकारची विशेष संशोधनात्मक ग्रंथ लिहिले आहेत. साहित्य क्षेत्रातील ही एकमेव अशी पुस्तक आहे. त्यांचे साहित्यिक व सामाजिक सेवा बघून रेडिओ आकाशवाणी केंद्र नागपूर, दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर त्यांची मुलाखत सुद्धा झालेली आहे. भारत सरकारच्या साहित्य अकादेमी दिल्लीच्या वतीने व माध्यमिक आश्रम शाळा चांदाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "ग्रामालोक" या कार्यक्रमात रानभाज्या तसेच रान वनस्पतींवर त्याचे कथन झाले आहे. या संशोधन ग्रंथास प्रस्तावना देणाऱ्या आदिवासी साहित्यिक सामाजिक कार्यकर्त्या



कुसुमताई अलाम, शुभेच्छापत्र देणारे पद्मश्री डॉ. परशुराम खुणे ,जेष्ठ साहित्यिक एडोकेट लखनसिंह कटरे, प्रसिद्ध लेखक, पत्रकार प्रा. डॉ.सुधीर अग्रवाल, नाटककार चुडाराम बल्हारपुरे सोबतच अशा दुर्मिळ असलेल्या ग्रंथाचे प्रकाशन वडसा येथे झालेल्या पाचव्या झाडीपट्टी नाट्यसंमेलनात गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री एडोकेट आशिष जयस्वाल व पद्मश्री डॉ.परशुराम खुणे ,झाडीपट्टी संमेलनाध्यक्ष प्राचार्य के. आत्माराम, सिनेअभिनेता भरत गणेशपुरे व मान्यवरांच्या हस्ते हजारो रसिकांच्या उपस्थितीत झाले आहे .

मराठबोली पुणे या संस्थेच्या वतीने रानभाज्यांच्या जगात या संशोधनात्मक ग्रंथाची निवड करण्यात आली. आणि "प्रभूरत्नाई" पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे.राष्ट्रसेवा परीषद पुणे आणि मराठबोली पुणे यांच्या संयुक्त वर्धापन दिनानिमित्त दि.८ फेब्रुवारी रोजी संगीता ठलाल यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दुर्गम भागातील गडचिरोली जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या संगीता ठलाल यांच्या संशोधन ग्रंथास अतिशय मानाचा पुरस्कार म्हणून मानले गेले आहे. या पुरस्काराबद्दल मराठबोली संस्थेचे संस्थापक परमेश्वर उमरदंड यांनी कळवले आहे , अध्यक्ष शिवाजी भापकर, उपाध्यक्ष रजनी घोंगळे, साहेबराव पळवे व संस्थेचे संगीता ठलाल यांनी आभार मानले. रानभाज्यांच्या जगात संशोधनात्मक ग्रंथास पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्वच स्तराहून संगीता ठलाल यांचे अभिनंदन केले जात आहे.

# संविधान प्रास्ताविकेचे वाचन, तंबाखूमुक्तीची शपथ:, सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अकोला - गजानन नगर डाबकी रोड येथील बहुजन विकास मंडळद्वारा संचालित क्रांतिज्योती मराठी प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थाध्यक्ष भास्करराव जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. तंबाखूमुक्त शपथ, असाक्षर मुक्त गावाची शपथ, देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत सादर करत कार्यक्रमाची शोभा वाढवली. याप्रसंगी पालक उपस्थित होते. दुपारी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. अनिल सुळकर, संतोष वारे, माजी सैनिक अजय जायभाये उपस्थित होते. अध्यक्षस्थानी जाधव उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणातून जाधव यांनी शाळेची प्रगती व शिक्षकांच्या मेहनतीचे कौतुक केले. त्यांनी स्थापन केलेल्या शाळेचा समाजाला होत असलेला फायदा पाहून समाधान व्यक्त केले. या शाळेतील विद्यार्थ्यांना कोणतीही फी नाही, २५ किमीपासून येणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत बस सुविधा आहे. शाळेचा ड्रेस, वर्षभराचे शैक्षणिक साहित्य, शाळेचे दप्तर, प्रवासाचा खर्च, सांस्कृतिक कार्यक्रमाचा खर्च व इतर खर्च शाळेचे अध्यक्ष जाधव, मुख्याध्यापिका अर्चना पालवे, शिक्षक अमोल मडावी, शिक्षिका विजया उंबरकर हे करतात, असे सांगण्यात आले. यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका, शिक्षक, कर्मचारी महादेव म्हैसने, वनिता तेलगोटे आदींनी परिश्रम घेतले.

# खुर्शिपारच्या 'सत्तासंग्रामात' सरपंचांची दाणादाण; १००% मते विरोधात पडल्याने हेमलता चव्हाण पायउतार
## भ्रष्टाचाराचे आरोप आणि मनमानी कारभाराला गावकऱ्यांनी दिले चोख प्रत्युत्तर; गुलालाची उधळण करत जल्लोष

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

आमगाव :- आमगाव तालुक्यातील खुर्शिपार ग्रामपंचायतीमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय नाट्यावर आज अखेर पडदा पडला. सरपंच हेमलता चव्हाण यांच्याविरुद्ध मांडण्यात आलेला अविश्वास ठराव आज ऐतिहासिक बहुमताने मंजूर झाला. विशेष ग्रामसभेत उपस्थित असलेल्या सर्व ६६० मतदारांनी एकमुखाने सरपंचांच्या विरोधात मतदान केल्याने त्यांचे सरपंचपद संपुष्टात आले आहे. "शून्य" मते पदरात पडल्याने सरपंचांचा 'जनाधार' पूर्णपणे संपल्याचे आजच्या निकालाने स्पष्ट केले. नेमके प्रकरण काय? १९ जानेवारी रोजी ग्रामपंचायत सदस्य आणि उपसरपंचांनी सरपंचांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत अविश्वास प्रस्ताव सादर केला होता. यावर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आज दि. २८ जानेवारी रोजी आमगाव तहसीलदारांच्या उपस्थितीत विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेला गावकऱ्यांची मोठी गर्दी उसळली होती. आरोपांची सरबत्ती आणि गावकऱ्यांचा रोष सरपंच हेमलता चव्हाण यांनी पदभार स्वीकारल्याच्या पहिल्या वर्षानंतर मनमानी कारभार सुरू केल्याचा आरोप सदस्यांनी केला. शासकीय जमिनीचे अनधिकृत प्लॉटिंग करून आर्थिक व्यवहार करणे, विकासकामांत सदस्यांना डावलणे आणि गावकऱ्यांना कामासाठी पैशांची मागणी करणे, असे गंभीर आरोप ग्रामसभेत चर्चिले गेले. इतकेच नव्हे तर, विरोधात बोलणाऱ्यांना अ‍ॅट्रॉसिटी कायद्याची भीती दाखवणे आणि वकिली पेशाचा धाक दाखवून धमकावण्याचे प्रकार घडल्याने गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट होती. सरपंचांचा बचावात्मक पवित्रा या संपूर्ण प्रक्रियेवर आपली बाजू मांडताना माजी सरपंच हेमलता चव्हाण यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. "माझ्यावर झालेले आरोप बिनबुडाचे आहेत. गावात ओबीसी समाज मोठ्या प्रमाणात असून एससी समाज कमी असल्याने मला हेतुपुरस्सर लक्ष्य केले जात आहे. काही लोक माझ्या सोबत आहेत," असा दावा त्यांनी केला. मात्र, प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी त्यांच्या दाव्यातील हवा निघून गेली. ऐतिहासिक निकाल: ६६० विरुद्ध ० मतदानाची प्रक्रिया सुरू झाल्यावर एक अभूतपूर्व दृश्य पाहायला मिळाले. उपस्थित सर्व ६६० मतदारांनी हात उंचावून सरपंचांच्या विरोधात कौल दिला. चव्हाण यांच्या समर्थनार्थ एकही हात वर झाला नाही. १०० टक्के मतदान विरोधात गेल्याचे घोषित होताच ग्रामपंचायत परिसर "जय भवानी, जय शिवाजी" च्या घोषणांनी दणाणून गेला. गावकऱ्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत आणि गुलाल उधळत हा विजय साजरा केला. लोकशाहीचा विजय "हा विजय कोणत्याही जातीचा नसून अन्यायाविरुद्ध एकत्र आलेल्या ग्रामशक्तीचा आहे," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. प्रशासनाने या निकालाची अधिकृत नोंद घेतली असून पुढील कार्यवाही सुरू केली आहे. या निकालामुळे तालुक्यात भ्रष्ट आणि हुकूमशाही प्रवृत्तीला चाप बसल्याची चर्चा रंगली आहे.

ठळक मुद्दे (Highlights):

* मतदान: ६६० (विरोधात), ० (समर्थनात).
* प्रमुख आरोप: भ्रष्ट कारभार, जमिनीचे बेकायदेशीर व्यवहार आणि धमकावणे.
* प्रतिक्रिया: सरपंचांचा जातीय भेदभावाचा आरोप मतदारांनी फेटाळला.

## सुनेत्रा पर्वाचे संकेत

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे मोठे आव्हान राष्ट्रवादीपुढे उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवारांचा राजकीय वारसा, पक्षाचे भवितव्य आणि सुनेत्रा पवार यांच्या भूमिकेकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यावर महाराष्ट्राचा कानाकोपरा खऱ्या अर्थाने शोकाकुल झाल्याचे मागील तीन दिवसांत पाहावयास मिळाले. अजित पवार यांच्या जाण्याने पवार कुटुंबीयांची, राष्ट्रवादी पक्षाची, बारामतीकरांची जितकी हानी झाली, त्याहून अधिक हानी अजित पवारांवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची व महाराष्ट्रातील जनतेची झाली आहे. स्पष्टवक्तेपणा, रोखठोक विचार मांडणारा एक राजकारणी महाराष्ट्राने गमविला. मराठीतील नावाजलेले कवी भा. रा. तांबे यांनी त्यांच्या कवितेत म्हटलेच आहे की, रामकृष्णही आले-गेले, त्याविण जग का ओसचि पडले. काळ हा सुरूच राहतो, वेळ कधीही, कोणासाठी थांबत नाही. अजित पवारांच्या अकाली जाण्याने पार्थ, जय व सुनेत्रा पवार तसेच अन्य पवार कुटुंबीयांचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. संघटना पोरकी झाली आहे. संघटना अधिक काळ निर्णायकी ठेवून चालत नाही. दु:ख बाजूला ठेवून निर्णय घ्यावेच लागतात. मासा पाण्यात रडतो, त्याचे अश्रू कधीही कोणाला दिसत नाहीत. तशीच अवस्था आज अजित पवारांवर प्रेम करणाऱ्या सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ व राष्ट्रवादीच्या अन्य नेत्यांची व मंत्र्यांची झालेली आहे. महाराष्ट्र राज्याचे तब्बल ६ वेळा अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपद भूषविले आहे. राज्याचा ११ वेळा अर्थसंकल्प अजितदादांनी मांडला आहे. अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्रीपद रिक्त झाले आहे. राज्याला नव्याने अर्थमंत्री शोधावा लागणार आहे. राज्याला उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तर राष्ट्रवादी पक्षाला संघटना सांभाळणारे नेतृत्व हवे. अजित पवारांच्या जाण्याने पवार कुटुंबीय शोकाकुल असले तरी उपमुख्यमंत्री व पक्षाचे प्रमुखपद रिक्त ठेवणे परवडणारे नसल्याने राष्ट्रवादीच्या पहिल्या फळीतील नेतेमंडळींनी धावपळ सुरू केली आहे आणि ते करणे गरजेचे होते. अजित पवारांची व शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याची चर्चा गेल्या दोन-अडीच महिन्यांपासून सुरू आहे. अजित पवारांनी त्यासाठी पुढाकार घेतला होता आणि शरद पवारांनीही त्यास संमती दिली होती. विलीनीकरणावर शिक्कामोर्तब होण्याची घटिका समीप आली आणि काळाने अजितदादांवर झडप घालून त्यांना हिरावून नेले. अजितदादांचे वारस म्हणून त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळावी आणि पार्थ पवारांना राज्यसभेवर पाठवावे, असा सूर आता राष्ट्रवादीच्या खासदार, आमदार, मंत्री, पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून आळविला जात आहे. शरद पवारांचे बोट धरून राजकारणात आलेल्या अजित पवारांनी काही कारणास्तव काकांपासून वेगळे होत आपली स्वतंत्र राजकीय चूल मांडली होती. अजित पवारांच्या पाठीशी स्वतंत्र जनाधार असल्याने विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार मोठ्या संख्येने निवडून आले होते. अजित पवारांच्या तसेच शरद पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादीमधील प्रत्येकाचीच नव्हे तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावेत, काका-पुतणे पुन्हा एकाच राजकीय व्यासपीठावर एकत्रित दिसावेत अशी महाराष्ट्रीय जनतेचीही इच्छा आहे.सुनेत्रा पवार या लोकसभा निवडणुकीनंतर राजकीय व्यासपीठावर सक्रिय झाल्या असल्या तरी गेली अनेक दशके त्यांनी अजित पवारांच्या खांद्याला खांदा लावून सर्वच क्षेत्रात पडद्याआडून साथ दिलेली आहे. लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळेंविरोधात पराभूत झाल्यावर अजित पवारांनी त्यांना राज्यसभेवर खासदार बनविले. एप्रिल २०१९च्या लोकसभा निवडणुकीमध्ये रायगड मतदारसंघातून राष्ट्रवादीकडून पार्थ पवार निवडणूक लढवित असताना सुनेत्रा पवारांनी पडद्याआडून बऱ्यापैकी धुरा सांभाळल्याचे राष्ट्रवादीमधील घटकांकडून सांगण्यात येत आहे. अजित पवारांनी सार्वजनिक कार्यक्रमातून भाषण करताना अनेकदा सुनेत्रा पवारांचे आभारही मानले. सुनेत्रा पवारांनी घर सांभाळल्याने मला महाराष्ट्र सांभाळता आला असल्याचे, राजकारणासाठी तसेच लोकांसाठी वेळ देता आला असल्याचे सांगत त्यांच्याप्रती कृतज्ञताही व्यक्त केली होती. बारामतीमधील अनेक कार्यक्रमांमध्ये अजित पवारांसोबत सुनेत्रा पवारांची उपस्थिती असायची. अजित पवारांनी स्वत:ची स्वतंत्र राजकीय चूल मांडल्यावर सुनेत्रा पवार यांचा राजकीय ठिकाणी वावर वाढण्यास सुरुवात झाली. आज अजित पवारांच्या जाण्याने पवार कुटुंबीय, राष्ट्रवादी संघटना, सरकारमधील अजित पवारांचे सहकारी या सर्वांना सांभाळण्याची जबाबदारी सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार या परिवारावर आलेली आहे. नजीकच्या काळात राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाल्यावर शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील, रोहित पवार आदी मंडळी मदतीला येतीलच. अजित पवारांच्या जाण्याने रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्रीपदावर सुनेत्रा पवारांनी बसावे अशी इच्छा राष्ट्रवादीमधील कार्यकर्त्यांकडून व पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे, अनेक आमदारांकडूनही तशी भावना उघडपणे व्यक्त केली जात आहे. तीन दिवसांचा दु:खवटा सुरू असल्याने राष्ट्रवादीमधील घटकांनी याबाबत सुनेत्रा पवार, पार्थ पवार व जय पवार यांच्याशी चर्चा केली नसली तरी लवकरच ते चर्चा करतील व निर्णय घेतील. अजित पवारांच्या जाण्याने दु:ख भरून येणार नसले तरी राष्ट्रवादी संघटनेसाठी, आमदारांसाठी, कार्यकर्त्यांसाठी त्यांना डोळ्यांतील अश्रू पुसून लवकरात लवकर सक्रिय व्हावे लागणार आहे. सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, नीलेश लंके आदी अनेक मंडळी सुनेत्रा पवारांच्या मदतीला असणारच. पार्थ पवार, जय पवार यांनी राष्ट्रवादीच्या तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क करावाच लागणार आहे. अडचणीच्या काळात अजितदादांचा परिवार स्वत:चे आभाळाएवढे दु:ख बाजूला सारुन पक्षासाठी, कार्यकर्त्यांसाठी सक्रिय झाला आहे, हे चित्र लवकरात लवकर निर्माण होणे राष्ट्रवादीसाठी आवश्यक आहे. सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्रीपदी विराजमान करण्यासाठी राष्ट्रवादीकडून हालचाली सुरु झाल्या आहेत. महाराष्ट्रातील शोकाकुल जनतेचीही ती इच्छा आहे. त्यामुळे लवकरच सुनेत्रा पवारांचा शपथविधी होवून अजित पवारांनंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातून त्यांना निवडून यावे लागेल. महाराष्ट्राच्या राजकीय सारीपटावर सुनेत्रा पर्वाचा शुभारंभ झाल्याचे पहावयास मिळणार आहे.

# राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेतील विचारांवर कार्यरत राहणे ही आज काळाची गरज आहे

**समाजातील वास्तव प्रश्नांना वाचा फोडल्या गेली पाहिजे.. त्यामधून समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडले पाहिजे..अशा कळकळीने सातत्याने सामाजिक विषयांवर लेखन करणाऱ्या लेखिका आणि कवयित्री प्रा. विजया मारोतकर यांनी नुकतेच अकोला येथे बाराव्या राज्यस्तरीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. हे त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील सातवे साहित्य संमेलन अध्यक्षपद होय. त्यांच्याशी साधलेला हा संवाद ..**



### आपण लेखनाकडे कशा वळला

शालेय जीवनात घडलेल्या एका प्रसंगाने मला याकडे वळविले. सहाव्या वर्गात असताना उन्हाळ्याच्या सुट्ट्यानंतर पहिल्याच दिवशी शिक्षकांनी उन्हाळ्याच्या सुट्ट्या मामाच्या गावाला कशा घालविल्या..? यावर लिहायला सांगितले. मला तर मामाच नाही.. म्हणून काल्पनिकच लिहावे लागले. मी जे काही लिहून नेले ते दुसऱ्या दिवशी शिक्षिकांना खूप आवडले आणि त्यांनी वर्गात वाचून दाखवले. "अग.. ही तर कविता आहे" म्हणाल्या त्यानंतर माझ्याकडे तीन वर्ष हस्तलिखिताचे संपादन आले.. कदाचित हेच या वाटेवर लेखनाकडे जाणारे पहिले पाऊल असावे. त्यानंतर विशेष लेखन असे तर मी काही केले नाही परंतु शिक्षण विवाह संसार नोकरी या धबडग्यातून लेखनाला वेळच मिळाला नाही परंतु एक घटना मला या वाटेवर आणण्याला कारणीभूत ठरली .ती म्हणजे माझ्या लहान भगिनींच्या आयुष्यात उभा झालेला नितांत दुःखद प्रसंग... त्यावेळी अचानक एक कविता आकारास आली. जिला राज्यस्तरीय पुरस्कारही मिळाले आणि मग मी लिहू लागली. लिहिता लिहिता कविता, कथा, लेख सारेच लेखन लिहायला सुरुवात झाली.

### सामाजिक विषयाकडे पाहण्याची दृष्टी कुठून मिळाली

सामाजिक विषयाकडे बघण्याची दृष्टी देण्याचे श्रेय राष्ट्रसंतांना जाते माझे बाबा अनाथ होते..ते राष्ट्रसंतांच्या मोझरी आश्रमातच वाढले. आई-वडिलांनी लहानपणापासूनच ग्रामगीता आणि सर्व महापुरुषांची चरित्रे वाचायला लावली. घरात गरिबी होती परंतु पुस्तकांची फार श्रीमंती होती. या वाचनातूनच व्यक्तिमत्व घडत गेले असावे. शाळेत नेहमीच निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेत पारितोषिके मिळायची.

### आपले लेखनाचे नेमके विषय कोणते असतात

आजवर सामाजिक विषयांवरच माझे लेखन झालेले आहे. समाजातील अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरा ग्रामीण भागातील विविध प्रश्न ,शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्यांच्या विधवांचे प्रश्न, बेरोजगारांचे प्रश्न, ऑटो चालक प्रश्न,भ्रष्टाचार, कार्यक्षेत्राच्या ठिकाणी होणारा त्रास ,महिलांचे विविध प्रश्न,स्त्री सुरक्षा ,नात्यागोत्यांची पडझड, त्यातील संवेदनशीलता अशा विषयांवर माझे लेखन होत राहिले.लॉकडाऊनच्या काळात मी लॉकडाऊन हा तत्कालीन घटनांवर कथासंग्रह लिहिला जो जगातील अल्पावधीतील पहिला कथासंग्रह ठरला. ज्याचे माई सिंधुताई सपकाळ यांच्या शुभहस्ते ऑनलाईन प्रकाशन झाले होते.

### आपले अलीकडे असे सामाजिक प्रश्न हेरणारे लेखन कोणते व आपले किती लेखन झाले आहे..?

तासिका प्राध्यापकांच्या जगण्यामध्ये असलेल्या व्यथावेदनांनी त्यांच्या जगण्याची केलेली होरपळ मांडणारी अजूनही... ही कादंबरी ४डिसेंबर२०२५ ला प्रकाशित झाली. जी डिंपल पब्लिकेशन, मुंबई यांनी प्रकाशित केली. आजवर मराठी साहित्यात कथा, कविता, चरित्र लेखन, समीक्षा, कादंबरी या प्रकारात ४५ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. अनेक पुस्तकांना सन्मानाचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

### आपल्या पोरी जरा जपून या कार्याबद्दल काय सांगाल

माझ्याकडे असलेल्या वक्तृत्वामुळे मला अनेकदा व्याख्यानमालेत व अन्य ठिकाणी वक्ता म्हणून निमंत्रण असायचे परंतु अशा विविध विषयांवर बोलण्यापेक्षा आपल्या या कार्याला विशिष्ट दिशा मिळावी असे मनातून सतत वाटत असायचे. अशात काही वर्षांपूर्वी हा मोबाईल तरुणाईच्या हातात आला .माझ्या अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनातील पडझड मी जवळून बघितली. एका घटनेने मी स्वस्थ झाले आणि * "पोरी जरा जपून" या वाटेवर निघाले. गेल्या बारा वर्षांपासून मी सातत्याने कार्यरत आहे. संपूर्ण महाराष्ट्र ,महाराष्ट्राच्या बाहेर हैदराबाद, गोवा येथे कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. मला मिळत असलेल्या सकारात्मक अभिप्रायांनी आणि समाजाच्या प्रेमाने मला या वाटेवर कार्यरत ठेवले.. आता तर हे माझे मिशन झालेले आहे .जे.. मी मरेपर्यंत करणार आहे. नुकताच माझा ४५६ वा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाने मला "पोरी जरा जपून फेम विजया मारोतकर " अशी ओळख दिली जी मला भावते सुद्धा..!

### या कार्यक्रमा दरम्यान आपणास आलेला एखादा रोचक अनुभव

"पोरी जरा जपून" कार्यक्रमानंतर मला अनेक अनुभव आलेले आहेत परंतु मोझरी येथे झालेल्या एका कार्यक्रमानंतर आलेला अनुभव आज या मुलाखतीच्या अनुषंगाने मला महत्त्वाचा वाटतो, तो असा की.." कार्यक्रम संपल्यानंतर एक वयोवृद्ध गृहस्थ माझ्याजवळ आलेत आणि मला म्हणालेत ..बेटा.. राष्ट्रसंत म्हणाले होते, प्रत्येक युगात वेगवेगळे प्रश्न असतील ..मी तर नसेल परंतु कुणाला तरी हे कार्य करावे लागेल.. आज मोबाईलच्या अशा धुमाकूळात तुझे कार्य फार महत्त्वाचे आहे .राष्ट्रसंतांनीच तुझी या कामाकरता नियुक्ती केलेली आहे असे माझे ठाम मत आहे."

मी त्यांना चरण स्पर्श केला आणि खरेच मलाही असेच वाटते असे म्हटले .

हा अनुभव मला सतत आठवत असतो .आजही या साहित्य संमेलनात मला पोहोचवण्यासाठी राष्ट्रसंतांचे आशीर्वादच कारणीभूत आहेत असे वाटते.

### आपणास प्राप्त पुरस्कार आणि सन्मानाबद्दल सांगा

पहिलाच काव्यसंग्रह स्वल्पविराम सामाजिक काव्यांनी समृद्ध असल्यामुळे त्याला महाराष्ट्र कामगार परिषद ,पुणे यांच्या वतीने पद्मश्री नारायण सुर्वे पुरस्कार प्राप्त झाला .. आणि लेखणीचे बळ वाढत गेले. त्यानंतर बऱ्याच साहित्य कृतींना सन्मानाचे पुरस्कार प्राप्त होत राहिले. नुकताच महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या सभागृहात "सावित्रीची लेक" हा पुरस्कार प्राप्त झाला. यापूर्वी जीवन गौरव पुरस्कार ,आदर्श शिक्षिका पुरस्कार, लोकमत सखी पुरस्कार, नागपूर फर्स्ट पुरस्कार असे अनेक सन्मानाचे 293 पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

### नवोदित लेखक लेखिकांना काय संदेश द्याल..?

आज फार मोठ्या प्रमाणात नवोदित लिहत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांनीही वास्तवावर लेखन करावे परंतु ते करण्याआधी वाचन, चिंतन, मनन करणे आवश्यक आहे .वांग्मयचौर्य न करता स्वत:ची ठसठशीत नाममुद्रा उमटविणारी वांग्मय निर्मिती करावी. " झाड झडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना" राष्ट्रसंतांनी वास्तव पेरण्याकरिता या पद्धतीने निसर्गातील पाना फुलांचा वापर केला ..तसा प्रभावी वापर करण्याचे कौशल्य स्वत:मध्ये निर्माण करावे.

### आपली आवडती कविता

**उन्मेष**

उन्मेषाचे नवीन वारे नव्या दिशेने नेतांना
थबकू नका रे पावलांनों..आता..काटा काढून घेतांना..
बोचण्याचा सराव झाला,त्या वाटेवरूनी येतांना..
शल्याचा कळला ना अर्थ..?,काळीज काढून देतांना..
फळाची अपेक्षाच नव्हती केवळ कार्यनिष्ठा जपतांना..
तरी क्षणात शून्य ठरविले,तयांनी उंची मोजतांना..
मनात माजून गेले काहूर,वादळ ते पेलतांना..
कचरु नका जराही आता,आभार काट्यांचे मानतांना...
त्यांनीच तर दिली ना गती,पावलांनों बेसावध
असतांना...
क्षितिजावर सूर्य पाहिला,
काल पश्चिमेस मावळताना...पण ...
त्याच तेजाने उलटविले सारे..आज पहाटे पूर्वेकडून
उगवतांना..
नवी आभा खुणावत होती.. जीवना...
आता तुला कवेत घेताना..

**-विजया मारोतकर**

ह्या प्रसिद्ध लेखिका, व्याख्याता आहेत.

# भयमुक्त परीक्षा

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या लेखी परीक्षा सुरू होत आहेत. या कालावधीत विद्यार्थ्यांना भयमुक्त व आत्मविश्वासपूर्ण वातावरण मिळणे गरजेचे आहे. अभ्यास, योग्य मार्गदर्शन, पालक-शिक्षकांचा सकारात्मक सहभाग आणि मानसिक स्वास्थ्य यांचा समतोल साधल्यास विद्यार्थी निर्धास्तपणे परीक्षेला सामोरे जाऊन यश संपादन करतील.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता बारावी आणि इयत्ता दहावीची लेखी परीक्षा सुरू होत आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या दरम्यान तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळाने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यांना तशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच दक्षता समिती व भरारी पथकांची नियुक्ती सुद्धा करण्यात आली आहे. असे असले तरी परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा देणे गरजेचे आहे. त्यासाठी परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांचा उत्साह वाढवायला हवा. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.भयमुक्त म्हणजे विद्यार्थी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जातील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वर्षभरातील केलेला अभ्यास अतिशय महत्त्वाचा असणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित जाऊन नियमितपणे अभ्यास केलेला असेल त्यांना परीक्षेचे भय वाटणार नाही. असे विद्यार्थी आनंदाने परीक्षेला सामोरे जातात. जे विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा करतात असे विद्यार्थी जसजशी परीक्षेची तारीख जवळ येते तसतसे तणावाखाली येत असतात. त्यामुळे त्यांना परीक्षेला जाताना भय वाटत असते. याला कारणं सुद्धा अनेक असतील. मात्र विद्यार्थ्यांना आपले ध्येय गाठायचे असेल तर अभ्यास महत्त्वाचा असतो. शाळा सुरू झाल्यापासून विद्यालयामध्ये जसा अभ्यास शिकवून झालेला असेल त्याप्रमाणे वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी अभ्यास एके अभ्यास जरी केला तरी आपण एक विद्यार्थी आहोत, आपल्यासाठी कोणीतरी परिश्रम करीत आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांचे विचार शिक्षणाशी निगडित असावेत. शिक्षणामुळेच आपण मोठे होऊ शकतो याची जाणीव त्यांच्यात निर्माण व्हायली हवी. महत्त्वाची बाब म्हणजे, विद्यार्थ्यांनी दररोज आपल्या आवडीचे वेळेवर जेवण घ्यावे. व्यायाम करावा, खेळ व पुरेशी झोप घ्यावी. मात्र अति विचार टाळावेत. अनाठायी वेळ वाया घालवू नये. त्यात मध्ये टी. व्ही.वरील कार्यक्रम व बातम्या पाहाव्यात यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडत असते. असे नियमित करायला हवे. हीच खरी यशाची गुरुकिल्ली असते. परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी मन शांत ठेवणे गरजेचे असते. मन शांत ठेवल्याने अभ्यासामध्ये मन रमते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती आपोआप निघून जाते.

# भारतमातेच्या रक्षणातील न बोलणारे शिलेदार!

यंदाच्या २६ जानेवारीला दिल्लीच्या कर्तव्य पथावर साकारलेली प्रजासत्ताक दिनाची परेड केवळ शस्त्रसज्जतेचे वा तांत्रिक सामर्थ्याचे दर्शन नव्हते; ती होती भारतभूमीसाठी प्राण अर्पण करणाऱ्या मूक योद्ध्यांना दिलेली जाहीर मानवंदना. हिमालयातील दुर्गम, हिमाच्छादित प्रदेशात कार्यरत असलेले ऊंट, रणांगणावर शिस्तबद्ध टापांवर धावणारे घोडे, तसेच दहशतवादविरोधी मोहिमांत निर्भयतेने पुढे झेपावणारे श्वान या सर्वांनी इतिहासाची आठवण करून दिली. भारताचा इतिहास उघडला, तर मूक प्राण्यांच्या शौर्यगाथा प्रत्येक पर्वात आढळतात. तानाजी मालुसरे सिंहगडाच्या कठीण कड्यावर चढताना ज्यांच्यावर विश्वास ठेवला ती घोरपड 'यशवंती'; हळदीघाटीच्या युद्धात जखमी अवस्थेतही महाराणा प्रतापांना सुरक्षित नेणारा घोडा 'चेतक'; छत्रपती शिवाजी महाराजांच्या संकटसमयी जीवाची बाजी लावणारा घोडा 'बादल' ही नावे इतिहासात केवळ प्राण्यांची नाहीत, तर निष्ठा, त्याग आणि कर्तव्यपरायणतेची अमर प्रतीके आहेत. ज्यांना भाषा नव्हती, पण स्वामी निष्ठा होती..

आजच्या काळातही ही परंपरा अखंड आहे. सीमेवर तैनात श्वान स्फोटके शोधतात, घुसखोरीचा इशारा देतात आणि गरज पडल्यास शत्रूसमोर ढाल बनतात. उंच पर्वतांमध्ये ऊंट व खच्चर रसद पोहोचवतात, जिथे यंत्रे थकतात तिथे जीवंत शक्ती उभी राहते. घोडे परेडमधील शिस्तीइतकेच रणांगणातील धैर्याचेही प्रतीक आहेत. ही मूक सेना दिवस-रात्र, ऊन-पाऊस-हिमवृष्टीत, कोणत्याही अपेक्षेविना आपले कर्तव्य बजावत असते.

म्हणूनच भारत ही केवळ भूमी नाही; ती माता आहे, म्हणूनच तिच्या रक्षणासाठी मनुष्याबरोबर मूक जीवसृष्टीही तत्पर असते. भारतीय संस्कृतीने सदैव प्राणिमात्रांमध्ये ईश्वरत्व पाहिले आहे गायीला माता, नंदीला शंकराचा वाहन, गरुडाला विष्णूचे आसन. ही दृष्टीच आपल्या सैन्यपरंपरेत उतरली आहे. मूक योद्ध्यांना आदर, प्रशिक्षण, संरक्षण देण्यामागे केवळ उपयुक्ततेचा विचार नाही; कृतज्ञतेचा संस्कार आहे.

कर्तव्य पथावर जेव्हा हे मूक शिलेदार पावलोपावली पुढे सरकले, तेव्हा त्यांच्या नजरेत अभिमान होता आणि आपल्या मनात ऋणानुबंध. ते आपल्याला आठवण करून देतात की देशभक्ती शब्दांत नव्हे, तर सेवेत असते.

**सौ. प्रांजली विजय ब्रम्हे,**
नागपूर

# कित्तूरची राणी चेन्नम्मा स्मृतिदिन

इंग्रजांनी आपल्या देशावर दीडशे वर्षांपेक्षा जास्त राज्य केले. या काळात त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय, अत्याचार केले. इंग्रजांच्या अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात- अज्ञात देशभक्तांनी लढा दिला. त्यात काही रणरागिणी ही होत्या . बऱ्याच महिला स्वातंत्र्यसैनिकांची किंवा देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या महिलांची इतिहासकारांनी नोंदच ठेवली नाही. काही बोटावर मोजण्या इतक्याच वीरांगणा आपल्याला माहित आहेत. त्यापैकी एक स्वातंत्र्यसेनानी म्हणजे कित्तूरची राणी चेन्नम्मा. राणी चेन्नम्मांचा जन्म कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील काकती किल्ल्यावर 23 ऑक्टोबर 1778 मध्ये झाला. ती अतिशय सुंदर होती. राणी चेन्नम्मा बालपणापासूनच घोडेस्वारी, तलवारबाजी, भालाफेकअशा युद्धशास्त्रात निपुण होत्या. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांचा विवाह कित्तूरचे राजे मल्लराज यांच्याशी झाला. कित्तूरची राणी चेन्नमा भारताची शूर स्वातंत्र्य सेनानी होती. राणी लक्ष्मीबाईच्या नेतृत्वाखाली 1857 च्या बंडाच्या पूर्वी 33 वर्ष आधी तिने ब्रिटिश राजवटीला आपल्या शौर्याने आव्हान दिले होते. भारतातील ब्रिटिश जुलमी राजवटीविरुद्ध लढा देणारी ती रणरागिनी पहिली महिला स्वातंत्र्य सेनानी बनली. 1824 मध्ये पतीचे आणि मुलाचे निधन झाले. त्या दु:खाच्या क्षणी राज्यात अस्थिरता निर्माण झाली. त्याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी कित्तूरवर आक्रमण केले. आणि राज्य वाचवण्यासाठी राणी चेन्नम्मा ने एक पुत्र दत्तक घेतला.

वारसदार म्हणून दत्तकपूत्राला इंग्रजांनी नकार दिला. दत्तक विधान नाकारत ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता. इंग्रजांनी कित्तूरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र चेन्नमा यांनी इंग्रज सैन्याशी निकराचा लढा दिला. आणि इंग्रज सैन्याचा धुवा उडवला. या विजयाने राणीने आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आणि तिचे सैन्य इंग्रजांशी शर्तीने लढले. तिने काही इंग्रज अधिकाऱ्यांना बंदी बनवले आणि युद्धबंदी करण्याच्या अटीवरच या अधिकाऱ्यांची सुटका करण्यात आली. परंतु युद्धबंदीचा करार करून इंग्रजांनी तो पाळला नाही. मात्र बैल होगल किल्ल्यात राणी चेन्नम्मा पकडल्या गेल्या. 2 फेब्रुवारी 1829 मध्ये इंग्रजांच्या कैदीतच राणी चेन्नम्मा यांचे निधन झाले. राणी चेन्नम्माचे शौर्य बघुन इंग्रज अधिकाऱ्यांनाही त्यांचे कौतुक वाटले. राणी चेन्नम्मा यांची शौर्यगाथा ही इतिहासातील स्फूर्तीदायक सुवर्ण अध्याय आहे. आजच्या तरुण पिढीला राणीचे हे शौर्य माहित व्हावे यासाठी त्यांची जयंती व स्मृतिदिन आपण साजरे केले पाहिजेत .अशा या शूर विरांगणेला कोटी कोटी नमन.

**सौ. माधवी पत्की**
नागपूर

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...



### महाराष्ट्र साहित्य परिषदेतील सध्याचे पदाधिकारी अनधिकृत

पुणे: महाराष्ट्र साहित्य परिषदेतील सध्याचे पदाधिकारी अनधिकृत असून परिषदेत कोणाचाही हस्तक्षेप नको, असा त्यांचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप माजी प्रा. धनंजय कुलकर्णी आणि शशांक महाजन यांनी केला आहे. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी परिषदेतील विविध गैरप्रकार उघडकीस आणले.प्रा. कुलकर्णी यांच्या माहितीनुसार, सन २०१९ पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेत निवडणूक घेण्यात आलेली नाही. नियमानुसार मतदारांना मतपत्रिका स्पीड पोस्टद्वारे मिळणे आवश्यक असताना, मागील दोन वर्षांत तसे घडले नसल्याचा अनुभव आहे. यासंदर्भात साहित्य परिषदेचे आजीव सभासद विजय शेंडगे आणि राजकुमार दुर्गुडे यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयात तक्रार दाखल करून न्यायालयीन लढा सुरू केला आहे.

### पुण्यात 25 वर्षीय महिलेवर दुर्मीळ ट्यूमर, टीबीवर यशस्वी उपचार



पुणे : पुण्यात एका २५ वर्षीय महिलेवर प्रसूतीनंतर निदान झालेल्या दुर्मीळ मेसेंटेरिक ट्यूमर आणि पोटाच्या क्षयरोगावर (ॲब्डॉमिनल टीबी) यशस्वी उपचार करण्यात आले. खराडी येथील मदरहुड हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी हे गुंतागुंतीचे प्रकरण हाताळले, ज्यामुळे महिलेचा जीव वाचला.या महिलेने ऑक्टोबर २०२४ मध्ये सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे एका निरोगी बाळाला जन्म दिला होता. गर्भधारणेदरम्यान तिच्या गर्भाशयावर १० ते १२ सेंटीमीटरचा फायब्रॉइड आढळला होता, जो प्रसूतीदरम्यान काढण्यात आला. मात्र, प्रसूतीनंतर पाच महिन्यांनी तिला पोटात जडपणा, वाढत्या वेदना आणि थकवा जाणवू लागला. नुकतीच प्रसूती झाल्याने हा थकवा सामान्य असल्याचे समजून तिने सुरुवातीला या लक्षणांकडे दुर्लक्ष केले. वेदना वाढत गेल्याने अखेर तिने वैद्यकीय सल्ला घेतला. तपासणीनंतर डॉक्टरांना तिच्या पोटात तब्बल १८ सेंटीमीटर आकाराची आणि ५२७ ग्रॅम वजनाची एक मोठी गाठ आढळून आली. सुरुवातीला फायब्रॉइडचा संशय होता, परंतु शस्त्रक्रियेदरम्यान ही गाठ गर्भाशयातून नसून आतड्यांना आधार देणाऱ्या मेसेंटरीमधून आलेली असल्याचे स्पष्ट झाले. ही गाठ अत्यंत दुर्मीळ मेसेंटेरिक ट्यूमर असल्याचे निष्पन्न झाले. त्याचबरोबर तिला पोटाचा क्षयरोगही झाल्याचे निदान झाले, ज्यामुळे हे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे बनले.हॉस्पिटलच्या प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. गौरी जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया पार पडली. त्यांना सल्लागार लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. सुशील देशमुख यांनी मोलाची साथ दिली. डॉक्टरांनी सांगितले की, वेळेत शस्त्रक्रिया झाली नसती तर आतडे आणि प्रमुख रक्तवाहिन्यांवर गंभीर परिणाम होऊन रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकला असता.

# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची अजितदादांची शेवटची इच्छा

## दादा, सुप्रिया सुळे अन् तटकरेंमध्ये बैठक झाली होती, अनिल देशमुखांचा गौप्यस्फोट

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्याने खळबळजनक गौप्यस्फोट केला आहे. "दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा एकत्र याव्यात अशी अजितदादांची इच्छा होती. त्यासाठी सगळे ठरले होते. अजितदादा, सुनील तटकरे आणि सुप्रिया सुळेंची बैठक झाली होती. जयंत पाटलांच्या घरी पहाटेपर्यंत बैठका चालल्या," असा दावा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला आहे. अजितदादांची ही शेवटची इच्छा पूर्ण करावी, अशी



भावनिक सादही त्यांनी यावेळी घातली.

विमान अपघातात अजित पवार यांच्यासोबत त्यांचे अंगरक्षक विदीप जाधव यांचाही मृत्यू झाला होता. अनिल देशमुख हे आज विदीप जाधव यांच्या साताऱ्यातील तरडगाव येथील घरी सांत्वनपर भेटीसाठी आले होते. यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनिकरणाबाबत मोठे गौप्यस्फोट केले.

**नेमके काय म्हणाले अनिल देशमुख?**

अनिल देशमुख यांनी दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाबाबत अनेक धक्कादायक तपशील समोर आणले आहेत. ते म्हणाले की, दोन्ही पक्ष एकत्र आणण्यासाठी आतापर्यंत एकूण १२ ते १३ बैठका पार पडल्या होत्या. शेवटची महत्त्वाची बैठक राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्या घरी झाली होती. ही बैठक रात्री १० वाजता सुरू होऊन पहाटे ३ वाजेपर्यंत चालली होती. या बैठकीला ८ ते १० प्रमुख नेते उपस्थित होते.



अजितदादा, सुनील तटकरे आणि सुप्रिया सुळे यांचीही या विषयावर स्वतंत्रपणे बैठक झाली होती. या सर्व चर्चांनंतर 'काय करायचे आणि कसे करायचे' हे सर्व ठरले होते.

**साहेबांना त्रास नको, हीच दादांची भावना**

अजित पवार यांच्या मनात शरद पवारांबद्दल असलेल्या आदराचा उल्लेख करताना देशमुख म्हणाले, "पवार साहेबांचे वय पाहता त्यांना आता अधिक त्रास देऊ नये, अशी अजितदादांची मनापासूनची भावना होती. दोन्ही पक्ष एकत्र यावेत, ही दादांची शेवटची इच्छा होती. आम्ही त्यांच्याशी झालेल्या १२ बैठकांचा तपशील साहेबांनाही दिला होता. आता दादा आपल्यात नाहीत, पण त्यांची ही इच्छा पूर्ण व्हायला हवी."

**शपथविधीच्या घाईवर नाराजी**

आज सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यावर बोलताना देशमुखांनी सुनेत्रा वहिनींचे अभिनंदन केले, पण सरकारच्या घाईवर टीका केली. "सुनेत्रा वहिनी उपमुख्यमंत्री झाल्या याचा आनंदच आहे, मात्र सध्या दुखवट्याची वेळ आहे. इतक्या घाईत शपथविधी उरकण्याची काहीच आवश्यकता नव्हती," अशा शब्दांत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

**अंग रक्षक विदीप जाधव यांच्या कुटुंबाचे सांत्वन**

अनिल देशमुख यांनी यावेळी विदीप जाधव यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. विदीप जाधव हे कर्तव्यदक्ष अधिकारी होते आणि अजितदादांच्या निधनासोबतच त्यांच्या कुटुंबावरही कोसळलेला हा डोंगर अत्यंत क्लेषदायक असल्याचे देशमुख म्हणाले.

## सुनेत्रा पवारांचा राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा:NCP च्या गटनेतेपदी एकमताने निवड, मुख्यमंत्र्यांकडे सोपवले नियुक्तीचे पत्र

दिव्य वतन /वृत्तसेवा

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाने मोठी पावले उचलली आहेत. अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली असून, आज सायंकाळी ५ वाजता त्या राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. तत्पूर्वी सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभेच्या खासदारीचा राजीनामा दिला.

आज दुपारी २ च्या सुमारास विधीमंडळात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या आमदारांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी



दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आणि त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, ज्याला छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिले. पक्षाच्या सर्व आमदारांनी या प्रस्तावाचे एकमताने समर्थन केले. या निवडीनंतर सुनेत्रा पवार आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ गटनेत्या म्हणून अधिकृतपणे काम पाहतील.

**सुनेत्रा पवारांना पक्षातील निर्णय घेण्याचा संविधानिक अधिकार**

पक्षाच्या या बैठीकमध्ये दोन प्रस्ताव मांडण्यात आले होते. पहिला प्रस्ताव हा सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या गटनेतेपदी निवड करण्यासंदर्भात होता, तर दुसरा प्रस्ताव हा सुनेत्रा पवार यांना पक्षातील सर्व निर्णय घेण्याचे संविधानिक अधिकार मिळण्यासंदर्भात होता. दोन्ही प्रस्ताव या बैठीकत मंजूर करण्यात आले आ

**उपमुख्यमंत्रीपद**

जबाबदारी स्वीकारण्यासाठी तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करत सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा खासदारकीचा राजीनामा दिला आहे. सुनेत्रा पवार यांनी उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती सीपी राधाकृष्णन यांच्याकडे राजीनामा सोपवला. सुनेत्रा पवारांच्या गटनेतेपदी निवडीनंतर पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सुनेत्रा पवार यांच्या निवडीचे अधिकृत पत्र सुपूर्द केले. मुख्यमंत्री हे पत्र राज्यपालांकडे सोपवणार असून, आज संध्याकाळी राजभवनावर शपथविधी सोहळा पार पडणार आहे.

## मुळा-मुठा नदी स्वच्छतेसाठी ठोस पाऊल उचलणार: केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी

दिव्य वतन /वृत्तसेवा

केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी यांनी पुण्यात घोषणा केली आहे की, मुळा-मुठा नदीच्या स्वच्छतेसाठी केंद्र सरकार ठोस पाऊल उचलणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील नद्यांच्या स्वच्छतेवर विशेष लक्ष दिले जात आहे. मुळा-मुठा नदीतील प्रदूषण ही एक गंभीर समस्या असून, प्रक्रिया न केलेले सांडपाणी आणि कचरा थेट नदीत सोडला जात असल्याची नोंद सरकारने घेतली आहे. भविष्यात स्थानिक महापालिकांच्या समन्वयातून 'नमामी गंगा'च्या धर्तीवर 'नमामी मुळा-मुठा' योजना आखून नदी सुधार प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

चौधरी हे एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र नौदल



शिक्षण व प्रशिक्षण अकादमी (मॅनेट) च्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमापूर्वी पत्रकारांशी बोलत होते. यावेळी एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, प्रोव्होस्ट सायली गणकर आणि कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुळा-मुठा नदीच्या प्रदूषणामुळे पुणे शहरातील भूजल पातळी, शेती आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे चौधरी यांनी सांगितले. ही समस्या अधिक गंभीर होऊ नये यासाठी केंद्र सरकार सर्वंकष नदी सुधार प्रकल्प राबवणार आहे. या प्रकल्पांतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढवणे, अवैध सांडपाणी जोडण्या तोडणे आणि औद्योगिक घटकांकडून होणाऱ्या प्रदूषणावर कठोर कारवाई करणे यावर भर दिला जाईल.

नदी स्वच्छतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल, तसेच जलगुणवत्ता तपासणीसाठी नियमित निरीक्षण यंत्रणा कार्यान्वित केली जाईल. नदीकाठावरील गावांकडून पात्रात कचरा टाकला जाऊ नये यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय साधण्यात येणार आहे. मुळा-मुठा नदी केवळ पाण्याचा स्रोत नसून ती एक सांस्कृतिक आणि पर्यावरणीय वारसा आहे. त्यामुळे नदीचे संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून स्थानिक नागरिकांची सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद निवडणूक:खासगी ऑनलाईन बैठकीचे बेकायदा रेकॉर्डिंग, विनोद कुलकर्णी यांच्याविरोधात सायबर पोलिसांकडे तक्रार

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी आयोजित एका खासगी ऑनलाईन बैठकीचे बेकायदा रेकॉर्डिंग करून ते प्रसारित केल्याप्रकरणी प्रतिस्पर्धी परिवर्तन उत्कर्ष आघाडीचे उमेदवार विनोद कुलकर्णी यांच्याविरोधात जळगाव सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. साहित्य संवर्धन आघाडीने ही तक्रार केली असून, कुलकर्णी यांनी बदनामी केल्याचा आरोप आहे.

जळगाव येथील राजेंद्र लखीचंद नन्नावरे (वय ५६) यांनी ही तक्रार दिली आहे. विनोद कुलकर्णी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५६ (बदनामी), कलम ४९९ आणि ५०० (मानहानी) तसेच




माहिती व तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ ई आणि ७२ नुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.तक्रारदारांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या नियोजनासाठी ही खासगी ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या रेकॉर्डिंगसाठी कोणतीही संमती देण्यात आली नव्हती. असे असतानाही विनोद कुलकर्णी यांनी या बैठकीचे गुपचूप रेकॉर्डिंग करून गोपनीयतेचा भंग केल्याचा आरोप आहे.

या अनधिकृत रेकॉर्डिंगचा आधार घेत कुलकर्णी यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन खोटी आणि बदनामीकारक विधाने केली, असे तक्रारीत नमूद आहे. यामुळे आपल्या सामाजिक आणि व्यावसायिक जीवनावर गंभीर परिणाम झाल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. जळगाव सायबर गुन्हे शाखा या प्रकरणाची तांत्रिक चौकशी करत आहे.

या संदर्भात राजेश पांडे यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत अभिजात मराठी भाषेतील साहित्य संवर्धनाविषयी चर्चा अपेक्षित आहे. साहित्यप्रेमी मतदारांनाही याच प्रकारचा प्रचार अपेक्षित आहे.

## शपथविधीनंतर सुनेत्रा पवारांना खाते वाटप:उत्पादन शुल्क, अल्पसंख्याक विकाससह तीन खात्यांची धुरा...

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- अजितदादांच्या निधनाच्या चौथ्या दिवशी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर आज त्यांना खात्यांचे वाटप करण्यात आले. सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्कासह तीन महत्त्वाची खाती देण्यात आली आहेत. मात्र, अजित पवारांकडील सर्वात प्रभावी मानले जाणारे 'अर्थ आणि नियोजन' खाते सुनेत्रा पवारांकडे न देता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ते स्वतःकडेच ठेवले आहे.

राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा पवार यांनी आज शपथ घेतली. आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदाची पद आणि गोपनियतेची शपथ दिली. शपथविधीच्या काही वेळानंतरच सुनेत्रा पवारांना अजित पवारांकडील खात्यांपैकी राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्यांक विकास ही तीन खाती देण्यात आली आहे आहेत.

राज्य उत्पादन शुल्क हे राज्याच्या तिजोरीत मोठा महसूल मिळवून देणारे खाते मानले जाते. तरुणांशी संबंधित



असलेल्या 'क्रीडा आणि युवक कल्याण' खात्याच्या माध्यमातून सुनेत्रा पवार राज्यभरात आपले जाळे विस्तारू शकतात. याशिवाय अल्पसंख्यांक विकास खाते देखील सुनेत्रा यांच्याकडे देण्यात आले आहे.

# पक्ष एकत्र असला की दुसरे लोक घुसखोरी करणार नाहीत:अमोल मिटकरींचं मोठं वक्तव्य!

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- मुंबईतील लोकभवनात सुनेत्रा पवार यांनी राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या चर्चांना उधाण आले आहे. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलमताई गोऱ्हे यांच्यासह राष्ट्रवादीचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. शपथविधीच्या वेळी सभागृहात अजित पवार अमर रहे, अशा घोषणा देण्यात आल्या. वातावरण भावूक आणि तितकेच राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे होते. या सोहळ्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी दिलेली प्रतिक्रिया आता चर्चेचा विषय ठरली आहे.

शपथविधीनंतर माध्यमांशी बोलताना अमोल मिटकरी यांनी स्पष्टपणे सांगितले की, अजित पवार यांची उणीव कोणत्याही परिस्थितीत भरून निघू शकत नाही. आमच्यासारखे अनेकजण आज दादांना खूप मिस करत होते, असे म्हणताना ते भावूक झाले. त्यांनी पुढे सांगितले की, सुनेत्रा पवार यांनी अत्यंत जड अंतःकरणाने उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. सुनेत्रा वहिनींनी हे शिवधनुष्य उचलले आहे, असे म्हणत त्यांनी त्यांच्या निर्णयाचे स्वागत केले.

सुनेत्रा पवार यांच्या



शपथविधीसाठी एवढी घाई का करण्यात आली, असा प्रश्न विचारण्यात आला असता मिटकरी म्हणाले की, हा निर्णय राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनी घेतलेला आहे. हा निर्णय पार्लमेंटरी बोर्डामध्ये झाला आहे. आम्हाला तो निर्णय पाळावाच लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले. लोक टीका-टिप्पणी करतात, पण अशा वेळी पक्ष अधिक महत्त्वाचा असतो, असेही ते म्हणाले. दुःखाच्या या वातावरणात कार्यकर्ते आणि पदाधिकारी सावरणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रीकरणाच्या चर्चांवर बोलताना मिटकरी यांनी आपली वैयक्तिक भूमिका मांडली. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात, ही माझी शंभर टक्के इच्छा आहे, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. मात्र, याबाबत अंतिम निर्णय वरिष्ठ नेते घेतील, असे सांगत त्यांनी संयमही दाखवला. मी इतका मोठा नाही की या विषयावर अंतिम मत देऊ, असे म्हणत त्यांनी नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.

यावेळी त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. आदरणीय साहेब आणि आम्ही एकत्र असलो पाहिजे. पक्ष एकत्र असला की दुसरे लोक घुसखोरी करणार नाहीत, असे ते म्हणाले. त्यांच्या मते, पक्षातील एकजूट टिकवणे हेच सध्याच्या परिस्थितीत सर्वांत महत्त्वाचे आहे. दोन्ही गट एकत्र आल्यास पक्ष अधिक मजबूत राहील, असे त्यांचे मत होते. मिटकरी यांनी पुन्हा एकदा अजित पवार यांच्या आठवणी जाग्या केल्या. आज अजितदादा नाहीत, त्यामुळे काही बोलण्याची इच्छाही होत नाही, असे ते म्हणाले.

शपथविधीच्या वेळी दिल्या गेलेल्या घोषणांचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, कार्यकर्त्यांच्या भावना अजूनही ताज्या आहेत. अशा वेळी राजकारणापेक्षा भावना आणि पक्षसंघटना सावरणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरू झालेल्या चर्चांना अमोल मिटकरी यांच्या प्रतिक्रियेमुळे नवा आयाम मिळाला आहे. त्यांच्या वक्तव्यातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी एकत्र यावे, असा स्पष्ट संदेश समोर आला आहे. अजित पवार यांच्या अनुपस्थितीत पक्षाची एकी अधिक महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. त्यामुळे येत्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एकीच्या दिशेने काही ठोस हालचाली होतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


अजित पवार यांची प्रशासनावर जबरदस्त पकड होती आणि अर्थमंत्री म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या निधनानंतर हे महत्त्वाचे खाते सुनेत्रा पवार यांच्याकडे जाईल, अशी राजकीय वर्तुळात चर्चा होती. मात्र, मुख्यमंत्र्यांनी हे खाते स्वतःकडे ठेवल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

राज्याचा अर्थसंकल्प आणि आर्थिक नियोजनासाठी अनुभवाची गरज असते. सध्याच्या संक्रमण काळात कोणतीही जोखीम न पत्करता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली आहे.

## फॅशन...




### ऐश्वर्या नारकरांच्या युनिक बुगडीची चाहत्यांना भूरळ,लालभडक साडीत केले फोटोशूट




मराठी मनोरंजनसृष्टीत सौंदर्य, सोज्वळपणा आणि अभिनयकौशल्य यांचा सुरेख संगम म्हणजे अभिनेत्री ऐश्वर्या नारकर. वर्षानुवर्षे आपल्या दमदार अभिनयाने आणि मोहक व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणाऱ्या ऐश्वर्या नारकर पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत यावेळी त्यांच्या अभिनयामुळे नव्हे, तर त्यांच्या पारंपरिक आणि युनिक लूकमुळे. नुकतेच ऐश्वर्या नारकर यांनी केलेले एक खास फोटोशूट सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या फोटोशूटमध्ये त्या लालभडक साडीत, पारंपरिक महाराष्ट्रीयन बुगडी परिधान करून दिसत आहेत. या लूकने चाहत्यांना अक्षरशः भुरळ घातली आहे. ऐश्वर्या नारकर यांनी नेसलेली कॉटनची काठपदराची साडी ही पारंपरिक आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे. ही साडी केवळ सौंदर्यदृष्टीने उठावदार नाही, तर आरामदायी आणि नैसर्गिक पोशाख म्हणूनही आदर्श आहे. काठपदराचा नाजूक आणि मृदू कापड, लाल किंवा हलक्या रंगातील छटा, आणि पारंपरिक नेसणी साडीला एक शालीन आणि मोहक लूक देतात. ऐश्वर्या नारकर यांनी ही साडी अशा प्रकारे नेसली की तिच्या साधेपणातही भव्यता झळकते.

कॉटन साडी असल्यामुळे तिचा पोत नैसर्गिक, हलका आणि थंडगार आहे, ज्यामुळे दीर्घकालीन नेसणीही आरामदायी वाटते. पारंपरिक महाराष्ट्रीयन बुगडी, हलकी टिकली आणि साधा मेकअप यासोबत ही कॉटनची काठपदराची साडी ऐश्वर्या नारकरच्या लूकला पूर्णता मिळत आहे. ऐश्वर्या नारकर यांची हेअरस्टाईल त्यांच्या पारंपरिक आणि सोज्वळ लूकचा महत्त्वाचा भाग आहे. या फोटोशूटमध्ये त्यांनी केस मोकळे किंवा हलक्या लाटा देऊन ठेवले आहेत, ज्यामुळे चेहऱ्यावर नैसर्गिक सौंदर्य अधोरेखित होते. यावेळी त्यांनी केस क्लिप करून सिंपल मोकळे सोडले होते. त्यांच्या या लुक वरून कोणाचीच नजर हटत नाही आहे. त्यांचे हे फोटो सोशल मीडियावर देखील चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहेत. ऐश्वर्या नारकर यांच्या कानातील बुगडी त्यांच्या पारंपरिक महाराष्ट्रीयन लूकचा ठळक घटक आहे. बुगडी ही केवळ दागिना नाही, तर महाराष्ट्रातील स्त्रीसौंदर्य आणि संस्कृतीचा अनमोल भाग मानला जातो. ऐश्वर्या नारकर यांनी जी बुगडी परिधान केली आहे, ती युनिक आणि पारंपरिक डिझाइनची आहे, जी त्यांच्या लाल काठपदराच्या साडीसोबत अप्रतिम जुळते. ही बुगडी सोन्याच्या टोनची, बारिक नक्षीकाम असलेली आहे, ज्यामुळे ती साध्या पोशाखातही उठून दिसते.

चाहत्यांच्या कमेंट्स या फोटोशूटसाठी अत्यंत उत्साही आणि स्तुत्य आहेत. सोशल मीडियावर त्यांच्या लाल काठपदराच्या साडीतील आणि पारंपरिक बुगडीसह लूकची प्रशंसा केली जात आहे. अनेकांनी लिहिले आहे की “खरंच मराठमोळी सौंदर्यप्रतिमा!. साधेपणातही इतकी मोहक दिसता येते!” त्यांचा हाच साधेपणा चाहत्यांना भावतो.

### अमृता फडणवीसांनी घेतले गुवाहाटीमधील कामाख्या देवीचं दर्शन; गळ्यात माळ , ड्रेसमधील साध्या लूकची नेटकऱ्यांना भूरळ

अमृता फडणवीसांनी यांनी सोशल मीडियावर माँ कामाख्या देवीच्या मंदिराला भेट दिली. आसामची राजधानी गुवाहाटी येथे असलेले माँ कामाख्या देवी मंदिर हे शक्तीपीठांपैकी एक मानले जाते. देशभरातून भाविक येथे देवीच्या दर्शनासाठी येतात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी कामाख्या देवीचे दर्शन घेतले आणि या भेटीची चर्चा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात रंगली.अमृता फडणवीस या केवळ मुख्यमंत्री पत्नी म्हणूनच नव्हे, तर गायिका, सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय असलेली व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या प्रत्येक सार्वजनिक उपस्थितीकडे लोकांचे लक्ष असते. मात्र गुवाहाटीतील या धार्मिक भेटीत त्यांनी अतिशय साधा, पारंपरिक आणि संयत लूक स्वीकारल्याने अनेकांनी त्यांचे कौतुक केले. त्यांचे हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

या भेटीदरम्यान अमृता फडणवीस पिवळ्या रंगाच्या चिकनकारी ड्रेसमध्ये दिसून आल्या. ना जड दागिने, ना भडक मेकअप फक्त हलके दागिने, साधी केशरचना आणि शांत, प्रसन्न चेहरा. त्यांच्या या सोज्वळ लूकने अनेकांच्या मनावर छाप पाडली. पिवळा रंग हा भारतीय संस्कृतीत शुभतेचे, सकारात्मकतेचे आणि आध्यात्मिक ऊर्जेचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे देवीच्या दर्शनासाठी निवडलेला हा रंग अनेकांनी अर्थपूर्ण असल्याचे म्हटले. त्यांच्या या वेशभूषेतून श्रद्धा आणि साधेपणाचे सुंदर दर्शन घडले. चिकनकारी ड्रेसवरील नक्षी ही अतिशय नाजूक, पारंपरिक आणि हाताने केलेल्या कलेसाठी ओळखली जाते. उत्तर प्रदेशातील लखनौ येथून ही कला उदयास आली असून तिचा सौंदर्यभाव आजही तितकाच लोकप्रिय आहे. लहान-मोठी फुले, कळ्या आणि वेलबुट्टी ही चिकनकारीची ओळख आहे. ही नक्षी ड्रेसला सौम्य आणि एलिगंट लूक देते. ह्या सुंदर ड्रेसमध्ये अमृता फडणवीस खूपच हटके दिसत आहेत. त्यांनी जड फाउंडेशन न वापरता लाइट बेस क्रीम वापरलेली दिसते. त्वचेचा नैसर्गिक टोन जपणारा, मॅट-टू-सॅटिन फिनिशचा मेकअप आहे.

# आलिया भट्ट सोशल मीडिया खाते डिलीट करू इच्छिते

## म्हणाली-अनेकदा मन करते, पण असे केल्याने चाहत्यांशी संपर्क तुटून जाईल

अभिनेत्री आलिया भट्टने नुकतेच सांगितले की, अनेकदा तिला सोशल मीडिया अकाउंट डिलीट करावेसे वाटते.

एस्क्वायर इंडियाला दिलेल्या मुलाखतीत आलिया म्हणाली, “असे अनेक दिवस असतात जेव्हा मी उठून विचार करते की, बस सोशल मीडिया डिलीट करून फक्त अभिनय करावा. वारंवार या चर्चेचा भाग बनू इच्छित नाही, पण मला हे देखील माहीत आहे की, असे केल्याने ज्या लोकांनी सुरुवातीपासून मला साथ दिली आहे, त्यांच्याशी संपर्क तुटून जाईल. मला असे नको आहे.”

माहितीनुसार, आलिया भट्ट ही देशातील सर्वाधिक फॉलो केल्या जाणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक आहे आणि इंस्टाग्रामवर तिचे 85 दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत.मुलाखतीत आलियाने आई झाल्यानंतर आलेल्या बदलांवरही भाष्य केले. तिने सांगितले की, आई झाल्यानंतर तिचे वैयक्तिक आयुष्य पूर्णपणे बदलले आहे. आता तिचे जग बहुतेक तिच्या मुलीभोवती फिरते. आलिया म्हणाली, "आता जेव्हा वैयक्तिक आयुष्याचा विषय येतो, तेव्हा ते इतकं वैयक्तिक झालं आहे की ते शेअर करणं थोडं कठीण वाटतं. माझ्या फोनची फोटो गॅलरी माझी मुलगी राहाच्या फोटोंनी भरलेली आहे. मला माझे फोटो काढण्यासाठी वेगळी मेहनत घ्यावी लागते."तिने आई होण्याला एक मोठा बदल म्हटले. आलियाच्या मते, यामुळे केवळ शरीरच बदलत नाही, तर विचार, प्राधान्यक्रम आणि जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.

आलियाच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाल्यास, ती लवकरच `अल्फा` या ॲक्शन थ्रिलर चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन शिव रावल करत आहेत. यामध्ये आलिया ऑल-वुमन कॉम्बॅट युनिटच्या कमांडरची भूमिका साकारत आहे. या चित्रपटात शरवरी वाघ देखील महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे आणि हा चित्रपट YRF स्पाय युनिव्हर्सचा भाग आहे. बॉबी देओल देखील यात दिसणार आहे.

`अल्फा` चित्रपट आधी ख्रिसमस २०२५ रोजी प्रदर्शित होणार होता. नंतर तो एप्रिलमध्ये प्रदर्शित होण्याची चर्चा होती आणि आता हा चित्रपट २०२६ मध्येच नंतरच्या कोणत्याही तारखेला प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे. अद्याप अधिकृत तारीख जाहीर झालेली नाही.

याव्यतिरिक्त आलिया, 



रणबीर कपूर आणि विकी कौशलसोबत संजय लीला भन्साळींच्या `लव्ह अँड वॉर` या चित्रपटातही दिसणार आहे.

## चित्रपट निर्माता विक्रम भट्ट व त्यांच्या पत्नीची जामीन याचिका फेटाळली

